सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३२० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्र शासन आणि ब्रिस्टॉल विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार

## गुणवंत विद्यार्थ्यांसाठी १०० टक्के शिष्यवृत्ती

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २५ फेब्रुवारी :** महाराष्ट्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या उच्च शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि ब्रिस्टॉल विद्यापीठ मुंबई कॅम्पस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात विधानभवन येथे सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सामंजस्य कराराच्यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, ब्रिस्टॉल विद्यापीठाच्या कुलगुरू व अध्यक्षा प्रा.एव्हलिन वेल्च,



ब्रिस्टॉल विद्यापीठाच्या मुख्य संचालन अधिकारी लुसिंडा पार, संचालक ज्युलिया हॉल, मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विन दामेरा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ब्रिस्टॉल विद्यापीठासारख्या जागतिक कीर्तीच्या संस्थेसोबत करार होणे ही अभिमानाची बाब आहे. या सहकार्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आणि त्यासाठी सक्षम असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे. शासन आणि अकॅडेमिया एकत्र आले तर आपण नक्कीच उज्ज्वल भविष्य निर्माण करू शकतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण

या करारानुसार 'मुख्यमंत्री व ब्रिस्टॉल विद्यापीठ शिष्यवृत्ती योजना' संयुक्तपणे विकसित व राबविण्यात येणार आहे. सामाजिक व आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण मिळावे, हा या योजनेमागील प्रमुख उद्देश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संपूर्ण कालावधीसाठी १०० टक्के शिक्षण शुल्क माफ करण्यात येईल. या शिष्यवृत्तीचा संपूर्ण खर्च ब्रिस्टॉल विद्यापीठ मुंबई कॅम्पसकडून उचलण्यात येणार आहे.

## थोडक्यात...

### इराणमध्ये लष्करी हेलिकॉप्टर कोसळून चौघांचा मृत्यू

**तेहरान :** अमेरिकेसोबत सुरू असलेल्या भीषण तणावाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (२४ फेब्रुवारी) इराणच्या मध्य भागात एक लष्करी हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना घडली. मध्य इराणमधील फळ आणि भाजीपाला बाजारात हे हेलिकॉप्टर कोसळले असून या दुर्घटनेत किमान ४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणी राज्य दूरदर्शननुसार हा अपघात इराणची राजधानी तेहरानपासून सुमारे ३३० किलोमीटर दक्षिणेस असलेल्या इस्फहान प्रांतातील दोर्चे ह शहरात झाला. इराणी वायुसेनेचा हवाई तळ इस्फहानजवळ स्थित आहे. इस्फहान हे इराणमधील प्रमुख अणुस्थळांपैकी एक मानले जाते. जून महिन्यात युनायटेड स्टेट ने इस्राइल – इराण युद्धादरम्यान याच अणुस्थळावर हल्ला केला होता. तसेच फोर्दो आणि नतान्झ या अणुस्थळांवरही बॉम्बहल्ले करण्यात आले होते.

### डिझेल खरेदी प्रक्रिया पारदर्शक

**मुंबई:** एसटी महामंडळाच्या डिझेल खरेदीसंदर्भातील निविदा प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, असा कडक इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला. काही कंपन्यांकडून माध्यमांमध्ये चुकीच्या बातम्या पसरवून निविदा प्रक्रिया प्रभावित करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा प्रयत्नांना अजिबात भीक घातली जाणार नसल्याचे प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.एसटी महामंडळाला दररोज सरासरी १० लाख ८७ हजार लिटर डिझेलची गरज भासते.

### ५ ओटीटी प्लॅटफॉर्मवर बंदी

**मुंबई:** ओटीटी क्षेत्रात पोर्नोग्राफीच्या वाढत्या प्रसाराला आळा घालण्यासाठी सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने कडक भूमिका घेत पाच ओटीटी प्लॅटफॉर्म ब्लॉक केले आहेत. सरकारने म्हटले आहे की, हे प्लॅटफॉर्म आक्षेपार्ह आणि अश्लील सामग्री प्रसारित करत होते, जे कायदा आणि आयटी नियमांचे उल्लंघन करते. ही कारवाई ऑनलाइन सामग्रीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि नियमांची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात आहे. ब्लॉक केलेल्या ओटीटी प्लॅटफॉर्ममध्ये मूडएक्सव्हीआयपी, कोयल प्लेप्रो, डिजी मूव्हीप्लेक्स, फील आणि जुगनू यांचा समावेश आहे.

### यु ट्युबर तरुणीची आत्महत्या


**हैदराबाद :** २१ वर्षीय यूट्यूबर तरुणीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना हैदराबादमधील रायदुर्गम भागात समोर आली आहे. कोमली असे मयत तरुणीचे नाव आहे. आई परदेशी नोकरी करत असल्यामुळे कोमली तिच्या काकाच्या घरी राहत होती. तिथेच तिने आयुष्याची अखेर केल्याची माहिती आहे. यूट्यूबर तरुणासोबत असलेल्या नातेसंबंधातील वादातून तिने टोकाचं पाऊल उचलल्याचा अंदाज आहे.

# मुंबई महापालिकेचा ८० हजार ९५२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २५ फेब्रुवारी :** मुंबई महापालिकेचा सन २०२६–२७ अर्थसंकल्प सादर करण्यात आला असून तब्बल ८०,९५२.५६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी नवनिर्वाचित स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांना सादर केला. तब्बल ८९.८४ कोटी रुपये शिलकीच्या या अर्थसंकल्पात महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी मुंबईतील फेरीवाल्यांना क्यू आर कोड प्रमाणपत्र देण्याची घोषणा करतानाच मुंबईकरांवर कोणत्याही प्रकारची करवाढ, दरवाढ आणि शुल्क वाढ लादलेली नाही. मात्र, सन २०१७ पासून बंद झालेल्या करमणूक शुल्काची आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच शाश्र्वत विकासाकरता निधी उपलब्ध करण्यासाठी महापालिका ग्रीन बाँड्स काढण्याची कार्यवाही करेल अशाप्रकारचा सुतोवाच केले आहे.

मुंबई महापालिकेचा सन २०२६–२७च्या शिक्षण विभागाचा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांनी शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांना तर स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांना



महापालिक आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी सादर केला. यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ अश्र्विनी जोशी, डॉ विपीन शर्मा, अभिजित बांगर , अविनाश ढाकणे, उपायुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड, प्रमुख लेखापाल देसाई, उपप्रमुख लेखापाल (अर्थसंकल्प)अरुण जाधव आदी उपस्थित होते.

चालू अर्थसंकल्प हा ७४ हजार ४०० कोटींचा मांडण्यात आला होता तो सुधारीत करून त्याचे आकारमान ६७.५१५.४० कोटी रुपये करण्यात आले. आणि आगामी अर्थसंकल्पाचे आकारमान या सुधारीत अर्थसंकल्पाच्या तुलनेत १९.३५ टक्क्यांनी वाढवून ८०,९५२.५६कोटी रुपयांवर नेवून ठेवले आहे. यामध्ये भांडवली खर्चाकरता ४८,१६४.२८कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर महसुली करता ३२,६९८.४४कोटी रुपये खर्च होणार आहे. आगामी आर्थिक वर्षांत १३,७६५.७४ कोटी रुपये इतका निधी तात्पुरत्या अंतर्गत हस्तांतरणद्वारे दर्शवला आहे. तर १४, २९४ कोटी रुपयांचा निधी हा विशेष निधी तथा राखीव निधीतून वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे अर्थसंकल्पाचा आकडा हस्तांतरण निधी व विशेष निधीच्या अंतर्गत कर्जाच्या आधारे वाढवण्यात आला आहे.

महापालिका आयुक्तांनी या अर्थसंकल्पात महसूल वाढीवर भर देतानाच जकातीपोटी करावयाच्या भरपाईसाठी अनुदान सहायपोटी १५.५५०.०२ कोटी रुपये, विकास नियोजन खात्याकडून १२,०५०कोटी रुपयांचा महसूल प्रस्ताविला आहे. मालमत्ता कराचा महसूल ७,००० कोटी रुपयांवर प्रस्तावित केले आहे. गुंतवणुकीवर व्याजातून २५७२.२३कोटी रुपये, जल आणि मलनि:सारण करातून ३५७८.२६कोटी रुपयांचे महसूल अपेक्षित मानला आहे. याशिवाय अग्निशमन दलाकडून शुल्कापोटी ८७२.००कोटी रुपये, परवाना विभागाकडून ३८१ कोटी रुपये, शासनाकडील थकबाकीची रक्कम १४६१ कोटी रुपये अशाप्रकारे महसूल वाढीचे स्त्रोत दर्शवले आहेत. मागील वर्षीपर्यंत २ लाख ३३ हजार कोटींच्या पायाभूत प्रकल्प कामांना मंजुरी दिलेली होती, आता ही रक्कम वाढून आता २ लाख ४४ हजार ५५२ एवढी झाली आहे.

## हवाई वाहतूक ही अत्यंत महत्त्वाची बाब : सुळे



**नवी दिल्ली:** मी विमान वाहतूक मंत्रालय यांचे आभार मानते. रोहित पवार यांनी हा विषय मुद्देसूद मांडला. आमच्या घरातील पुरुष गेला आहे. हे दु:ख पाच कुटुंबातील लोकांच आहे. ही वेळ दुसर्या कोणावर येऊ नये ही पांडुरंगाकडे प्रार्थना करते. अशा घटना घडत असतील तर तपासणी झाली पाहिजे असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा तथा महासंसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे यांनी नवी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.

सुप्रियाताई सुळे बोलताना म्हणाल्या की,रोहित पवार, जय पवार यांनी हा विषय लावून धरला. हवाई वाहतूक ही अत्यंत महत्त्वाची आणि गांभीर्यची बाब आहे. ही एक सुरुवात आहे. मला हा पहिला रिपोर्ट आहे अस वाटतं. विमान वाहतूक मंत्री हे व्यवस्थित तपास करण्याच्या सूचना देतील.

# महाराष्ट्रातील व्याघ्र संवर्धनासमोर मोठे आव्हान

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २५ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्यामध्ये २०२५ या एकाच वर्षात तब्बल ४१ वाघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत लेखी उत्तराद्वारे सादर केली आहे. या मृत्यूंच्या कारणांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, २८ वाघांचा मृत्यू नैसर्गिक कारणांनी झाला असला तरी, उर्वरित १३ वाघांचा बळी हा मानवी हस्तक्षेप आणि अपघातांमुळे गेला आहे.यात ८ वाघ विविध अपघातांमध्ये, ४ वाघ विजेचा धक्का लागल्याने, तर १ वाघ शिकारीमुळे दगावला आहे.

या वाढत्या घटनांच्या पार्श्र्वभूमीवर सरकारने रेल्वे आणि रस्ते अपघात रोखण्यासाठी वनक्षेत्रातील प्रस्तावित प्रकल्पांमध्ये वन्यप्राण्यांच्या सुरक्षित वावरासाठी अंडरपास व ओव्हरपास बांधण्याचे निर्देश दिले आहेत, तसेच रेल्वेचा वेग ताशी ४० किमीपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या सूचनाही केल्या आहेत. शिकारीच्या संकटाचा सामना करण्यासाठी 'विशेष व्याघ्र संरक्षण दल' सक्रिय करण्यात आले असून, वनपरिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची जाळी, बिनतारी यंत्रणा आणि तपासणी नाक्यांद्वारे कडक पाळत ठेवली जात आहे. याशिवाय, वाघांच्या भ्रमणमार्गावर कॅमेरा ट्रॅप बसवणे, पंधरवड्यातून एकदा त्यांच्या अस्तित्वाचा मागोवा घेणे आणि पाणवठ्यांवरील विषप्रयोगासारख्या घटना रोखण्यासाठी नियमित गस्त घालणे अशा उपाययोजना राबविल्या जात आहेत.

व्याघ्र प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असतानाही वाघांचे होणारे मृत्यू ही पर्यावरणाच्या दृष्टीने गंभीर बाब असून, मानव–वन्यजीव संघर्ष रोखणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे रक्षण करणे, हेच खऱ्या अर्थाने संपूर्ण जंगलव्यवस्थेच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक आहे.

### मुलाकडून वडिलांचा निर्घृण खून

**लखनौ:** उत्तर प्रदेशच्या राजधानी लखनौमध्ये एक अशी घटना घडली आहे, ज्याने संपूर्ण देश हादरला आहे. स्वतःच्या बापाचे तुकडे करून त्यांची विल्हेवाट लावणाऱ्या नराधम मुलाला, अक्षत सिंहला, बुधवारी अखेर जेलची हवा खावी लागली. आशियाना पोलिसांनी जेव्हा अक्षतला न्यायालयात हजर करण्यासाठी नेले, तेव्हा प्रसारमाध्यमांशी बोलताना त्याच्या चेहऱ्यावर कोणताही मोठा पश्र्चात्ताप दिसला नाही, उलट त्याने अत्यंत साध्या सुरात 'सॉरी, चुकून झाले' असे उत्तर दिले. एका प्रतिष्ठित व्यावसायिकाची त्याच्याच पोटच्या गोळ्याने केलेली ही निर्घृण हत्या आता संपूर्ण देशामध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.

# शिवशाही बसेस बंद होणार? राज्य शासनाचा महत्वाचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २५ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यातील दिमाखदार 'शिवशाही' बसेसबाबत राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सततचे बिघाड आणि प्रवाशांचा घटता प्रतिसाद पाहता, महामंडळाच्या मालकीच्या ४५३ शिवशाही बसेसचे आता निमआराम आणि साध्या बसेसमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. यामुळे एकेकाळी प्रवाशांच्या पसंतीस उतरलेली शिवशाही आता नव्या साध्या अवतारात रस्त्यावर धावताना दिसेल.

एसटी महामंडळाच्या ताफ्यात सध्या स्वमालकीच्या एकूण ६८८ शिवशाही बसेस आहेत. त्यापैकी ४५३ बसेस सध्या सुस्थितीत असून धावत आहेत. मात्र, या गाड्यांचे आयुर्मान १० वर्षांपेक्षा जास्त नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. वारंवार होणारे तांत्रिक बिघाड आणि वातानुकूलित यंत्रणेतील तक्रारींमुळे या बसेसचे रूपांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिवशाही बसेसमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याने प्रवासी आता या बसकडे पाठ फिरवू लागले होते, हे शासनानेही मान्य केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिवेशन कालावधीपुरता त्यांच्याकडील मंत्रिपदाचा तात्पुरता कार्यभार इतर मंत्र्यांकडे सोपविल्यावरुन विरोधकांनी मंगळवारी सत्ताधारी पक्षावर निशाणा साधण्याचा प्रयत्न केला. मात्र २०१९ पासूनच हा नवा पायंडा पाडण्यात आल्याचा खुलासा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केला. तसेच यासंदर्भातील संवैधानिक तरतूद वाचून दाखवत विरोधकांच्या आरोपातील हवा काढली.

# स्त्री–भ्रूणहत्या प्रकरणी राज्यभरात धडक मोहिम राबवणार – आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २५ फेब्रुवारी :** स्त्री–भ्रूणहत्याप्रकरणी सरकार गंभीर आहे. राज्य शासनाच्या वतीने दर तीन महिन्याला प्रत्यक्ष तपासणी करून दोषींवर कारवाई करीत आहोत. तरीदेखील संपूर्ण राज्यभरात तपासणीची एक धडक मोहिम राबवू, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आंबेडकर यांनी बुधवारी (२५ फेब्रुवारी) विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देताना दिली.

जितेंद्र आव्हाड, हेमंत ओगले, बाबासाहेब देशमुख, नमिता मुंदडा, नितीन राऊत, प्रशांत बंब आदी आमदारांनी या चर्चेत सहभाग घेतला. मंत्री प्रकाश आबिटकर आपल्या उत्तरात म्हणाले की, एका अहवालानुसार, राज्यात एक हजार पुरुषांमागे मुलींचे प्रमाण ९१३ आहे. लातूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यात मुलींचे जन्मप्रमाण पुरुषांपेक्षा जास्त आहे. मात्र, काही जिल्ह्यांमध्ये अजूनही काम करणे गरजेचे आहे. हे काम प्रभावीपणे करण्यासाठी सर्वे, सूचना आणि तिथल्या अधिकाऱ्यांसोबत देखरेख करून निश्र्चितपणे चांगले काम करू. जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकारी यांना सूचना देऊन या संदर्भातील सध्या असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.



जितेंद्र आव्हाड यांनी स्त्रीभ्रूणहत्या हे पातक आहे, जे डॉक्टर यामध्ये दोषी असतील त्यांच्यावर मकोका लावा, अशी मागणी केली. यावर मंत्री प्रकाश आबिटकर यांनी गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र कायदा (पीसीपीएनडीटी) कायद्यातील कलमांमध्ये सुधारणा करणार असल्याचे सांगितले. तसेच सरकारच्या वतीने सातत्याने याबाबतचा आढावा घेणे सुरु आहे. २०२३–२४ मध्ये ७५, २०२४–२५ मध्ये ९४ आणि आता जानेवारीपर्यंत ९० स्टिंग ऑपरेशन केले असून यातील दोषींवर कारवाई केली आहे. एकूण ६२७ न्यायालयीन प्रकरणांत १२९ जणांना शिक्षा झाली आहे. याबाबत अजूनही जागृकता होण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मासिक पाळीत महिला कर्मचाऱ्यांना सुट्टी मिळणार ?

प्रसूतीपूर्व लिंगनिदान रोखण्यासाठी कायद्याची कठोरपणे अमलबजावणी सुरू आहे. दोषी डॉक्टरांची सनद रद्द करण्याचे १९३ प्रस्ताव मेडिकल काऊन्सिलकडे पाठविली असून अनेकांच्या सनदा रद्दही झाल्या आहेत. या कायद्यातील कलमे अधिक कठोर करण्याचा निश्र्चित विचार करण्यात येईल. तसेच मासिक पाळीच्या काळात महिलांना सुट्टी देता येईल का, गर्भलिंग निदान प्रकरणात मकोका लावता येईल का, याबाबत विधि व न्याय विभागाकडून सल्ला घेण्यात येईल, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी यावेळी दिली.

बेकायदा गर्भजललिंग तपासणी करर्णाया केंद्रांची माहिती देण्यासाठी खबरीला १ लाख रूपयांचे बक्षिस ठेवण्यात आले आहे. त्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. तसेच मकोका लावता येऊ शकतो का हे तपासण्यासाठी विधि व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात येईल असे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले. तसेच, राज्यात दर हजारी स्त्री–पुरूष गुणोत्तरात काही जिल्ह्यात चांगल्या प्रकारे वाढ होत आहे. यात लातूर जिल्हा पुढे असून तिथे स्त्री–पुरूष गुणोत्तर १२६५ इतके आहे. वर्धा ११७३, धाराशिव १०५०, गडचिरोली १०९३ आणि गोंदिया येथे १०५० इतके गुणोत्तर असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.



तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्टद्वारे नवोदित दिग्दर्शकांना राष्ट्रीय व्यासपीठ

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय चित्रपटसृष्टीतील नव्या पिढीतील दिग्दर्शकांचा शोध घेण्यासाठी झी तर्फे 'झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्ट'ची घोषणा करण्यात आली आहे. देशव्यापी स्तरावर राबविण्यात येणारा हा ओम्नीचॅनेल उपक्रम उदयोन्मुख फिल्ममेकर्ससाठी स्केलेबल आणि उच्च-प्रतिष्ठित व्यासपीठ निर्माण करणारा ठरणार आहे.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे देशातील विविध चित्रपट उद्योगांचे प्रतिनिधित्व करणारे दिग्गज दिग्दर्शक परीक्षक व मार्गदर्शक म्हणून एकत्र आले आहेत. यामध्ये अनुराग कश्यप, रवि जाधव, सृजित मुखर्जी, नाग अश्विन, समुथिरकणी, लिजो जोस पेलिसेरी आणि हेमंत राव यांचा समावेश आहे.

हिंदी, मराठी, बंगाली, तेलुगू, तामिळ, मल्याळम आणि कन्नड अशा सात भाषांमध्ये ही स्पर्धा राबवली जाणार असून, विविध सांस्कृतिक पार्श्र्वभूमीतील कथाकथनकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे. निवड झालेल्या सहभागींना रोख बक्षिसे, व्यावसायिक ओळख तसेच 'झी'च्या व्यापक कॉन्टेन्ट इकोसिस्टममधील सहकार्याच्या संधी उपलब्ध होतील.

भारतीय कथाकथन परंपरेला नवी दिशा देणारा हा उपक्रम नव्या पिढीतील फिल्ममेकर्ससाठी एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार आहे.

### 'प्रोजेक्ट्स टुडे' चा नवा, एआय-आधारित व्यावसायिक संधी प्लॅटफॉर्म

**छत्रपती संभाजीनगर :** 'प्रोजेक्ट्स टुडे'ने भारतातील प्रकल्प क्षेत्राला (प्रोजेक्ट इकोसिस्टिम) अधिक मजबूत करण्यासाठी एआयवर आधारित एक नवीन व्यवसाय संधी प्लॅटफॉर्म सुरू केला आहे. या सुविधेमुळे आता प्रकल्पांची संपूर्ण माहिती, टेंडर्स, सर्वात कमी बोली (ङ१) आणि ऑर्डर्सचे अपडेट्स, तसेच संबंधित महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती एकाच ठिकाणी मिळेल. यामुळे कंपन्यांना योग्य वेळी, योग्य प्रकल्पांशी जोडले जाणे अधिक सोपे होणार आहे. या सुधारित प्लॅटफॉर्ममध्ये व्यावहारिक परिणामांवर लक्ष केंद्रित करणारे 'एआय' तंत्रज्ञान आणले आहे. यात बीओक्यू सर्च, उप-प्रकल्पांचा मागोवा, टेंडरपासून ऑर्डरपर्यंतचा प्रवास, आणि निविदा भरणाऱ्यांची माहिती अशा सुविधा मिळतील. तसेच, व्यवसायाच्या संधींचा अंदाज घेणारी साधने, विश्र्वासार्हता तपासण्यासाठी डॅशबोर्ड आणि महत्त्वाच्या व्यक्तींशी संबंध जोडणारी यंत्रणाही यात आहे. यामुळे केवळ 'काय घडत आहे' हेच नाही, तर 'पुढे काय करावे' हे समजणे सोपे होईल, ज्यामुळे कंपन्यांना योग्य वेळी योग्य निर्णय घेता येतील.

### सोनाटाचे 'वॉच आऊट फॉर अस', कहाणी ध्येयाच्या ध्यासाची

**छत्रपती संभाजीनगर :** माणूस कुठून आला ते महत्त्वाचे नसते तर पुढे किती मोठी झेप घेण्याची जिद्द त्याच्यामध्ये आहे यावर त्याचा मोठेपणा ठरतो. सोनाटाचे नवे ब्रँड फिल्म कॅम्पेन 'वॉच आउट फॉर अस' उद्दिष्ट, वेग आणि आत्मविश्र्वासाने प्रेरित असलेल्या आजच्या पिढीचा गौरव करते. कोणतेही संकट आले तरी त्यावर मात करून जिद्दीने पुढे जाण्याची ओढ या पिढीमध्ये आहे. त्यांच्यासाठी 'स्टाईल' म्हणजे फक्त फॅशन नव्हे तर त्यांच्या प्रगतीची ओळख आहे. किंबहुना त्यांची स्टाईल हीच त्यांची ओळख आहे. अत्यंत मेहनतीने स्वतःचे भविष्य स्वतः घडवू पाहणाऱ्या तरुणांच्या सन्मानार्थ सोनाटाने ही फिल्म तयार केली आहे.

आयडीएफसी फर्स्ट बँकेने राखला विश्र्वास

**मुंबई :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने चंदीगडमधील आपल्या एका शाखेत घडलेल्या घटनेच्या खुलाशा संदर्भात आपली तत्वनिष्ठ भूमिका आणखी स्पष्ट केली आहे. सदर घटना हरियाणा सरकारच्या काही विभागांच्या खात्यांशी संबंधित असून त्याबाबत बँकेने अलीकडेच माहिती जाहीर केली होती. प्राथमिक निष्कर्षांनुसार असे दिसून आले आहे की, शाखेतील काही कर्मचाऱ्यांनी बनावट दस्तऐवज आणि पेमेंट सूचना मंजूर करून फसवणूक केली आहे. या प्रकारामध्ये बाह्य व्यक्तींशी संगनमत असण्याची शक्यता आहे आणि संबंधित विभागांकडून सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असतानाही बँकेने हरियाणा सरकारच्या संबंधित विभागांनी दावा केलेली १०० टक्के मुद्दल आणि व्याजाची रक्कम त्वरित अदा केली आहे. ही एकूण रक्कम ५८३ कोटी रुपये आहे. अदा करण्यात येणाऱ्या अंतिम रकमेत भविष्यातील कोणताही दावा किंवा ताळमेळ यानुसार फेरबदल होऊ शकतो.

इत्ती सी खुशी हा शो प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे

सोनी सबवरील इत्ती सी खुशी हा शो प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे, अन्विता (सुम्बुल तौकीर खान) हिच्या प्रवासातून, जी आपल्या भावंडांची जबाबदारी सांभाळते. शोमध्ये योग्य-अयोग्य यातील संघर्ष आणि खोताचिवाडीमध्ये सुरू असलेल्या रहस्यमय चोरीच्या घटनांमुळे वाढत जाणारी दरी दाखवली जात आहे. या सगळ्यात अन्विता आणि तिची धाकटी बहीण चिडिया (आयेशा विंधारा) यांचं नातं कथानकाचं केंद्रबिंदू बनलं आहे.

### टर्टलमिंट सोबत भविष्याभिमुख विमा सल्लागार व्यवसाय उभारत आहेत

**नाशिक :** नाशिकमध्ये वास्तव्यास असलेले ५२ वर्षीय उद्योजक अनिल सिंग हे २०१८ पासून टर्टलमिंट चे डिजिटल पार्टनर म्हणून कार्यरत आहेत. ग्राहक सेवा आणि डिजिटल विमा वितरण परिसंस्थेशी सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातून त्यांनी वर्षानुवर्षे आपला विमा व्यवसाय उभारला आहे. मूळचे प्रयागराज येथील असलेले सिंग यांनी वयाच्या १७व्या वर्षी पदवी शिक्षण घेत असताना काम करण्यास सुरुवात केली. १९९६ ते २००३ या काळात त्यांनी वाहतूक व्यवसाय चालवला; मात्र हा व्यवसाय व्यावसायिकदृष्ट्या टिकला नाही आणि त्यानंतरच्या काळात त्यांना दीर्घकाळ आर्थिक तणावाचा सामना करावा लागला. २०१० ते २०१८ दरम्यान त्यांनी वैयक्तिक आणि आर्थिक अडचणींना तोंड दिले, ज्यामुळे त्यांनी पर्यायी व्यावसायिक संधींचा शोध सुरू केला.

भारत रणभूमी दर्शन मोहिमेचा नवी दिल्लीत यशस्वी समारोप

**छत्रपती संभाजीनगर:** टोयोटा किर्लोस्कर मोटर(टीकेएम), भारत रणभूमी दर्शन मोहिमेचा अधिकृत मोबिलिटी पार्टनर म्हणून, तसेच भारतीय सशस्त्र सेना यांच्या सहकार्याने देशव्यापी मोहिमेचा यशस्वी समारोप करण्यात आला. या

# शालिवाहन पतसंस्थेला दीपस्तंभ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २४ फेब्रुवारी :** महाराष्ट्र राज्यातील सहकारी पतसंस्था चळवळीत दीपस्तंभाप्रमाणे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पैठण येथील शालिवाहन पतसंस्थेला सलग सहाव्या वर्षी राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने मंगळवार दिनांक २४ रोजी पुणे येथील रिव्हरहुड रिसॉर्ट येथे या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयराव जोशी, फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांचे हस्ते शालिवाहन पतसंस्थेचे चेअरमन किशोर चौहान यांना सन्मानपूर्वक राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी फेडरेशनच्या कार्यकारी संचालिका सुरेखाताई लवांडे उपस्थित होत्या. शालिवाहन पतसंस्थेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके या वेळी उपस्थित होते.

राज्यातील सहकार चळवळीला बळकट करण्यासाठी भरीव योगदान देत नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून प्रेरणादायी कार्य केल्याबद्दल सलग सहाव्या वर्षी शालिवाहन पतसंस्थेची छत्रपती संभाजीनगर विभागातील २०० ते ३०० कोटी ठेवी असलेल्या पतसंस्थांच्या गटा मधून दीपस्तंभ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या शालिवाहन पतसंस्थेने चेअरमन किशोर चौहान यांचे कल्पक नेतृत्व, सर्व उच्चशिक्षित संचालक मंडळाचे धोरणात्मक पाठबळ, सर्व समर्पित अधिकारी, कर्मचारी आणि संपूर्ण शालिवाहन कुटुंबाचे प्रामाणिक प्रयत्नाचे जोरावर २९ व्या वर्षात पदार्पण करत असताना पैठण येथील मुख्य कार्यालयासोबत १३ शाखांच्या माध्यमातून ५०० कोटी व्यवसायकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे. समाजोपयोगी सेवा देण्यातही शालिवाहन पतसंस्था महाराष्ट्रात अग्रेसर आहे.



## राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २५ फेब्रुवारी :**

शाळे कडून सोयगाव नगरपंचायत स्वच्छता कर्मचारी यांचा सत्कार तसेच विद्यार्थ्यांनी शालेय परीसर स्वच्छ करून केले अभिवादन जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज जयंती निमित्ताने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण पुजन करण्यात आले.

यावेळी सोयगाव येथील समाजसेवक तथा प्रबोधनकर यांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांची वेशभुषा परीधान करून विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबा महाराज यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन करून स्वच्छतेची प्रतिज्ञा दिली.

यावेळी शाळे कडून सोयगाव शहर स्वच्छ ठेवण्याचे कार्यकरणार्या करणार्या नगरपंचायतीचे स्वच्छता महीला कर्मचारी याचा सत्कार करण्यात आला.यानंतर सर्व उपस्थित मान्यवर व शाळेतील विद्यार्थी यांनी शालेय परीसर झाडूने झाडून स्वच्छ करून अभिवादन केले.यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचे आवडते भजन गोपाला गोपाल देवकीनंदन गोपाला गाऊन शालेय परीसर दनाणून सोडला. यावेळी सोयगाव केंद्र प्रमुख फिरोज तडवी,समाजसेवक दत्तू रोकडे,विष्णू मापारी,दादु काळे सर्व स्वच्छता महीला कर्मचारी अगणवाडी सेविका तसेच शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, सुरेखा चौधरी, पंकज रगडे, मंगला बोरसे, रामचंद्र महाकाळ, सविता पाटील,गणेश बाविस्कर,प्रतिभा कोळी, अकुश काळे, अनिल देसाई,विवेक महाजन,शुभम देसले,पुनम लाड उपस्थित होते.

### धोकादायक जागेवर बॅनर लावल्यास गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २४ फेब्रुवारी :** श्रीक्षेत्र पैठण नगर परिषदेच्या वतीने नुकतेच एका जाहीर प्रगटनाद्वारे शहरात कोणत्याही धोकादायक व जोखामीच्या ठिकाणी अनधिकृतपणे लावण्यात आलेले होर्डिंग, बॅनर, पोस्टर शुभेच्छा फलक इत्यादी काढून घ्यावेत नसता संबंधित व्यक्ती,संस्था,एजन्सीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर महापालिका क्षेत्रात अनधिकृत होर्डिंग काढतांना विजेचा धक्का लागून मनपा कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला होता. यामुळे संपूर्ण जिल्ह्यात धोक्याच्या ठिकाणी बॅनर बॅन अशी नियमावली लागू होत आहे. यातच तीर्थक्षेत्र पैठण नगरितील विजेचे खांब, रस्त्याच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी तसेच धोकादायक जोखमीच्या ठिकाणी लावण्यात आलेली होर्डिंग, बॅनर, पोस्टर,शुभेच्छा फलक इत्यादी काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र मालमत्ता विदृपीकरण अधिनियम १९९५ चे कलम ३ व अनधिकृत होर्डिंग, बॅनर मुळे कोणतेही जीवितहानी अपघात झाल्यास संबंधित व्यक्ती, संस्था आदिवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सर्वांनी याची गंभीर नोद घ्यावी अशी माहिती पैठण नगर परिषद मुख्याधिकारी डॉ पल्लवी अंभोरे यांनी दिले आहेत. अनधिकृत बॅनरबाजीला आळा बसणार असल्याने आता तीर्थक्षेत्र पैठणच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

### गाडगेबाबांनी कीर्तनांतून कर्मकांडाचा कचरा दूर करून शिक्षणाचा विचार रुजवला : प्रा. डॉ. पठाडे



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २५ फेब्रुवारी :** राष्ट्रसंत गाडगे बाबा यांनी झाडूने गावातील कचरा आणि कीर्तनाद्वारे लोकमनातील अंधश्रद्धा व कर्मकांड दूर करून शिक्षणाचा विचार समाजात रुजवण्यासाठी महाराष्ट्रभर पायपीट करत लोकप्रबोधन केले, असे प्रतिपादन लोकसाहित्य अभ्यासक व ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेषराव पठाडे यांनी केले. (कै.) पुंजाजी बाबा बहुद्देशीय प्रतिष्ठान व लोककलावंत सांस्कृतिक सेलच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज, माता रमाई, माता भीमाई आणि संत गाडगेबाबा यांच्या संयुक्त जयंती कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

समर्थनगर येथील गांधी भवन येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य ग. ह. राठोड होते. पँथर नेते ड. रमेशभाई खंडागळे, समाजसेवक अंबादास रगडे, शाहीर अशोक बागुल आदींची उपस्थिती होती.

डॉ. पठाडे यांनी गाडगेबाबांच्या ग्रामस्वच्छता, नीतीमत्ता, आरोग्य आणि सामाजिक जागृतीसाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या साध्या व प्रभावी कीर्तनातून लोकजागृती घडली, असे त्यांनी नमूद केले. यावेळी मान्यवरांनी प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून शाहिरीतून अभिवादन केले. विविध लोकगीतांद्वारे प्रबोधनपर संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन एकनाथ त्रिभुवन यांनी केले. मोठ्या संख्येने लोककलावंत व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश; साईराज मगर प्रथम, ९ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. २५ फेब्रुवारी :** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (छचचड) परीक्षा २०२५-२६ मध्ये कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय, कन्नड येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून तालुक्यात शाळेचे नाव उज्वल केले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी शाळेतील ४८ विद्यार्थी बसले होते. यापैकी ९ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून, हे यश शाळेच्या गुणवत्तेची साक्ष देणारे आहे.

या परीक्षेत साईराज बाळासाहेब मगर याने १०३ गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. तसेच सोनवणे वेदांत विशाल, देवेंद्र सचिन जंगले, तनिष्का सुनील कुमावत, चव्हाण यश अशोक, गायकवाड आदिती बाबासाहेब, तांबट श्र्लोक किरण, शेख अमन महबूब, शेजवळ प्रसाद आप्पाराव यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षक पाटील सुनील, भाग्यश्री खैरनार, शुभम मरकड, संदीप साबळे यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या योगदानाबद्दल शाळा प्रशासनाच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सभाहत शेख, संस्थेचे सचिव सागर जाधव, अध्यक्षा ताराबाई जाधव, केंद्रप्रमुख बाजीराव ताठे, मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या यशामुळे परिसरात शाळेच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा दखल घेतली जात असून, भविष्यातही विद्यार्थी अशीच यशस्वी कामगिरी करतील, असा विश्र्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व स्वागत



**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. २५ फेब्रुवारी :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आज सकाळी १० वाजून १० मिनिटांनी छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आगमन झाल्यानंतर राष्ट्रपतींचे महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी, महाराष्ट्र राज्याचे राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, महानगर पालिका महापौर समीर राजुरकर, जालन्याचे खासदार डॉ. कल्याणराव काळे, आमदार प्रदीप जयस्वाल, आमदार अनुराधा चव्हाण, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी तसेच पोलीस आयुक्त प्रवीण पवार उपस्थित होते.

त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि राज्यपाल आचार्य देवव्रत हे भारतीय वायुसेनेच्या हेलिकॉप्टरने शेगाव (जिल्हा बुलडाणा) येथे नियोजित कार्यक्रमासाठी रवाना झाले.

## नाथषष्टी यात्राकाळात अधिकाऱ्यांना सर्तक राहण्याची सूचना

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २५ फेब्रुवारी :** संत एकनाथ महाराज विश्र्वस्त मंडळाच्या प्रमुख पुढाकाराने विश्र्वस्त मंडळाचे अध्यक्ष आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली नाथ समाधी मंदिराच्या प्रांगणात प्रमुख अधिकारांच्या उपस्थितीत नाथषष्टी यात्रेची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी नाथषष्टी यात्रा काळात भक्तांच्या सेवेत अधिकाऱ्यांनी सतर्क रहावे अशी सूचना आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी दिल्या.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी निलम बाफना, संभाजी आडकुणे, तहसीलदार ज्योती पवार, मुख्याधिकारी डॉ पल्लवी अंभोरे, गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, नगराध्यक्ष विद्या कावसाणकर, सां. बा.अभियंता राजेंद्र बोरकर, उप अभियंता शेळके,कार्यकारी विश्र्वस्त दादा पाटील बारे, उप नगराध्यक्ष तुषार पाटील, दूध संघाचे नंदलाल काळे,पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, उप मुख्याधिकारी नागेश खोडवे, उप मुख्याधिकारी सोमनाथ गर्जे, पाणी पुरवठा प्रमुख व्यंकटी पापुलवार,मार्केट कमिटीचे सचिव नितीन विखे,व्यापारी महासंघाचे पवन लोहिया,माजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, भुषण कावसाणकर, नगरसेवक बजरंग लिंबोरे, जितुभाऊ परदेशी,शिवराज परिक, शेखर शिंदे,प्रा संतोष गव्हाणे,गजानन मडके, पं. स. प्रमुख राजेश कांबळे, शहादेव लोहारे, स्वप्नील साळवे,जालिंदर आडसुळ, गौरव आठवले, खुशालराव भवरे, राजन सातघरे,संभाजी सव्वाशे,जनार्धन मिटकर,राजेश मानधने, सह मोठ्या संख्येने नाथभक्त उपस्थित होते.

कडक सूचना

राज्यातील क्रमांक २ ची मोठी यात्रा असलेल्या पैठणच्या नाथषष्टी यात्रेला देशभरातून लाखो भविक भक्त दक्षिण काशीत येतात. ९ मार्च ते ११ मार्च असा नाथषष्टी यात्रा उत्सव पार पडत असून भाविकांच्या सेवेत अधिकाऱ्यांनी सतर्क राहावे अशी कडक सूचना आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी दिल्या.यात्रा काळात नाथ भक्तांना स्वच्छ पाणी, शौचालय, वाढीव पाण्याचे टँकर,अतिक्रमण मुक्त रस्ते, दिंडी तसेच फडाला सुविधा, जागोजागी आरोग्य पथक, पोलीस पथक, वाहणाला मोफत पार्किंग, पार्किंकचे पैसे घेणाऱ्यांवर पोलीस कारवाई, यात्रा काळात अधिकारी कर्मचारी यांनी मुख्यालयी राहणे,जड वाहतुकीत बदल, वारकरी भाविक भक्तांसाठी जादा बस गाड्या,अतिरिक्त बस स्थानक, प्रवेश रस्त्याची स्वच्छता, काटे झुडपे काढणे, खड्डे भरणे, वीज व्यवस्था सुरळीत ठेवणे, यात्रा काळात दारू बंदी, उघड्यावरील मांस विक्री बंदी, जलजीवन व भूमिगत गटार योजना मार्गी लावणे, भाविकांची सुरक्षितेसाठी जागोजागी सिसिटीव्ही, यात्रा परिसरतसेच वाळवंट परिसराची स्वच्छता, यात्रेत येणाऱ्या दुकानदारांना सुविधा, पोट भाटेकरू टाळणे, पोलीस पथक, चोरीला




रोकथांब साठी पथक, वाळवंट भागात दक्षता पथक,राहतपाळणे सुविधा,दर्शन व्यवस्थेचे नियोजन, अपंगासाठी दर्शन व्यवस्था, वाळवंट स्वच्छता,यात्रा काळात स्वच्छ अन्नपुरवठा, भेसळ टाळणे, स्वयंसेवकांसाठी सुविधा, नाथसागरातून स्नानासाठी स्वच्छ पाणी,नाथ सागरावर अतिरिक्त जलतरण पथक,संभाव्य उपाय योजनेत मठ, शाळा, मंगल कार्यालये आरक्षित ठेवणे, गॅस सुविधा, वाढीव अन्न धान्य सुविधा, दिंडी प्रमुखांचा सम्मान, ठिकाठिकाणी पाणपोई, धूळ मुक्त रस्ते, अवैध वाळू वाहतूक बंद करणे, अवैध धंदे बंद करणे सह यात्राकाळातील सर्व बाबींवर आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.तसेच बैठकीला गैर हजर असलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना ही यावेळी देण्यात आल्या.

बैठकीला नाथवंशजांची अनुउपस्थिती.

नाथ समाधी मंदिर प्रांगनात आयोजित आढावा बैठकीला समस्त नाथ वंशजांची अनुउपस्थिती जाणवली याप्रकरणी प्रमुख मानाची दिंडी प्रमुख नाथवंशज ह.भ.प.पुष्कर रावसाहेब महाराज गोसावी यांच्याशी संपर्क साधला असता आपल्याला बैठकीचा निरोप तसेच निमंत्रणच मिळाले नाही. अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. तसेच दुसरे मानाची दिंडी प्रमुख नाथवंशज थोर कीर्तनकार ह.भ.प योगीराज महाराज गोसावी यांनी ही आढावा बैठकीचे निमंत्रण नाही मिळाल्याचे सांगितले तर मानाची दिंडी तसेच पालखी प्रमुख नाथवंशज विश्र्वस्त ह.भ.प. रघुनाथ महाराज पांडव यांच्याशी संपर्क साधला असता तहसीलदार तर्फे आपणास बैठकीची सूचनाच आली नसल्याचे त्यांनी सांगितले. एकंदरीत या आढावा बैठकीत नाथवंशजांची अनुपस्थिती पहिल्यांदाज जाणवली.

तरुण भारत

छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क -७३८५५६७०३१

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि.औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क. ३९/२०२६

अर्जदारः-

१) रमा विलास कांबळे, उ. वय ५६ वर्षे, २) सुखदेव चिंधू खरे, वय ४७ वर्षे, दोघांचा धंदा शेती, दोघे रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.क. १ ह.मु. नाशिक, ता. जि. नाशिक.

विरूध्दः-

गैरअर्जदारः- निरंक

प्रकरण :- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

वारस सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत चिंधू दगडू खरे हे दि. ०६/०१/२०१९ रोजी पळासखेडा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ व २ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ व २ हे मयत चिंधू दगडू खरे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १०/०४/२०२६.

आज दि. २५/०२/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

**विभागीय लिपीक**
**(दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव)**
**सहायक अधीक्षक**
**(दिवाणी न्यायालयक स्तर 'सोयगाव)**

प्रत :

१) दिवाणी न्यायालय (क.स्तर), सोयगांव नोटीसबोर्ड.

२)ग्राम पंचायत पळासखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.

धाराशिव
# जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धाराशिवात १ मार्चला विधी सेवा शिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**
राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ मार्च २०२६ रोजी श्री तुळजाभवानी क्रीडा संकुल, धाराशिव येथे भव्य विधी सेवा शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबादचे न्यायमूर्ती शैलेश ब्रम्हे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर उपस्थित राहणार आहेत. महामेळाव्यात विविध शासकीय विभागांचे स्टॉल्स उभारून योजनांची माहिती देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभही दिला जाणार आहे. तसेच नागरिकांना मोफत विधीसेवा व कायदेविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांनी या महामेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# चोर सोडून संन्याशास फाशी, महावितरणचा बेजबाबदार कारभार : लाखो रुपये थकवणाऱ्याना अभय; किरकोळ थकबाकीदारांची वीज गुल?

**मंगरुळमध्ये वीजप्रश्नावर संताप; महावितरणवर भेदभावाचे आरोप... सर्वसामान्य कुटुंबातील दहावी, बारावी परीक्षार्थीना नाहक त्रास...**






**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२५ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे महावितरणच्या बेजबाबदार कारभाराविरोधात ग्रामस्थांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लाखो रुपयांची थकबाकी असलेल्या ग्राहकांवर कारवाई न करता किरकोळ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित केला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सध्या दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू असताना वीज खंडित झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असून सर्वसामान्य कुटुंबांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

गावातील अनेक भागांत अनधिकृतपणे 'आकडे टाकून' वीज वापर सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांना याची माहिती असूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. उलट वेळेवर बिल भरणाऱ्या प्रामाणिक ग्राहकांनाच अव्वाच्या सव्वा बिलांचा फटका बसत असल्याची तक्रार आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, काही धनदांडग्यांची १ ते ५ लाखांहून अधिक थकबाकी असूनही त्यांचा वीजपुरवठा खंडित केला जात नाही.

मात्र, एखाद्या गरीब ग्राहकाची किरकोळ थकबाकी असल्यास त्वरित वसुलीचा तगादा लावून त्याचा वीजपुरवठा तोडण्यात येतो. त्यामुळे थकबाकीदार आणि नियमित ग्राहकांसाठी वेगळे कायदे आहेत का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

काही ग्राहक महावितरण कर्मचाऱ्यांना लाच देऊन बेकायदेशीर वीज वापरत असल्याची शंका व्यक्त करण्यात येत असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### अनागोंदी कारभाराचा शेवट होणार का?
महावितरणच्या निष्क्रिय व दुटप्पी धोरणामुळे गोरगरीब ग्राहक भरडले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. बेकायदेशीर वीज वापरणाऱ्यांवर कठोर कारवाई करून प्रामाणिक ग्राहकांना न्याय द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली नाही, तर भविष्यात महावितरणविरोधात मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## आ. कैलास पाटील यांच्या वाढदिनी विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटप



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२५ फेब्रुवारी -**
धाराशिव-कळंब तालुक्याचे आमदार कैलास पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बॅनरबाजीवरील अवास्तव खर्चाला फाटा देत एक स्तुत्य शालोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे समाधान बाराते व भगवान ओव्हाळ यांच्या पुढाकारातून बुधवार दि.२५ रोजी मलकापूर व संजीतपूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय बॅगचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करण्याची ही अभिनव संकल्पना पालक व ग्रामस्थांनीही कौतुकास्पद असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुनिल पाटील, रामहारी मुंढे, समाधान बारकुल, लहु बारकुल, बालाजी बारकुल, बापू जमदाडे, सुहास बारकुल, सचिन कोकाटे, मारुती बारकुल, उमेश भालेराव, किरण लोमटे, सुधीर पायाळे, नरसिंग लोमटे, विलास कुटे, चितांबर पुरेकर, रामलिंग बाराते, राहुल बाराते, शहाजी हवालदार, बापू मगर, दशरथ मगर आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या वतीने मुख्याध्यापक भंडारे व शाम ओव्हाळ यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुंदर लोमटे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुधीर लोमटे यांनी केले. कार्यक्रम उत्साहात व समाधानकारकरीत्या पार पडला.

## वाशी तालुकामध्ये अवकाळी पाऊस; शेतकऱ्यांची धावपळ



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ फेब्रुवारी -**
मागील दोन-तीन दिवसांपासून वातावरणात ढगाळपणा वाढला असून हवामान तज्ज्ञांनी अवकाळी पावसाचे संकेत दिले आहेत. काही भागात झालेल्या अवकाळी सरींमुळे पिकांचे नुकसान झाल्याची चित्रे समोर येत असून हातातोंडाशी आलेला घास अस्मानी संकट हिरावून नेईल की काय, अशी धास्ती शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात (दि. २४) फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास अचानक पावसाचे वातावरण तयार झाले. आकाश काळवंडून आले आणि वाऱ्यासह सरी कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याने तालुकाभर शेतकऱ्यांची एकच धावपळ उडाली.

तालुक्यात ज्वारी, गहू आणि हरभरा या पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली आहे.

काही गावांमध्ये अगोदर पेरणी झालेल्या भागात ज्वारीची काढणी सुरू आहे, तर काही ठिकाणी ज्वारी व गहू ही पिके फुलोऱ्यात असून परिपक्वतेच्या टप्प्यावर आहेत. हरभरा पिकाची काढणीही सुरू असून अनेक शेतकऱ्यांनी हरभरा काढून शेतात मोठमोठे ढिगारे करून ठेवले आहेत.

अचानक ढग दाटून आल्याने या ढिगाऱ्यांना पावसापासून वाचवण्यासाठी शेतकऱ्यांनी चवाळे, ताडपत्री व उपलब्ध साधनसामग्री घेऊन तातडीने उपाययोजना केल्या. काही काळ तालुक्यात धावपळीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

सुदैवाने जोरदार पाऊस न झाल्याने मोठे नुकसान टळले; मात्र अवकाळी संकटाची टांगती तलवार अद्यापही कायम असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. हवामानातील अनिश्चिततेमुळे आगामी दिवसांत अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचेही शेतकरी सांगत आहेत.

## वृद्धाची सोन्याची अंगठी फसवणुकीने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२५ फेब्रुवारी -**
भुम बसस्थानक परिसरात एका वृद्धाची सोन्याची अंगठी फसवणुकीच्या प्रकारात लंपास झाल्याची घटना समोर आली आहे.



फिर्यादी माणिक नरहरी जोगदंड (वय ७६, रा. हातोला ता. वाशी जि. धाराशिव) हे दि.१२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.१० वाजण्याच्या सुमारास भुम बसस्थानक येथे गावाकडे जाणाऱ्या बसची प्रतीक्षा करत बसले होते. त्यावेळी अनोळखी दोन इसमांनी त्यांच्याशी संवाद साधून तुमची ५ ग्रॅम सोन्याची अंगठी बदलून दोन अंगठ्या करून देतो असे सांगून त्यांची दिशाभूल केली.

फसवणूक करून आरोपींनी अंदाजे ४० हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी घेवून पोबारा केला. या प्रकरणी माणिक जोगदंड यांनी दि.२३ फेब्रुवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिकचा तपास पोलिस करीत आहेत.

## उमरग्यामध्ये अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ फेब्रुवारी -**
शहर व तालुक्यात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर दि. २४ (मंगळवार) रोजी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशन यांच्या वतीने उमरगा पोलीस स्टेशन येथे निवेदन सादर करण्यात आले. शहरात वाढत चाललेल्या छेडछाड, पाठलाग, प्रेमाच्या जाळ्यात अडकवून पळवून नेणे आदी प्रकारांविरोधात तातडीने कठोर व प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी ठोस मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

फाउंडेशनच्या प्रतिनिधींसह स्थानिक सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, गेल्या काही महिन्यांपासून शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस परिसरात टवाळखोर तरुणांचे घोळके वाढले आहेत. मुलींची छेडछाड, टिंगल-टवाळी, घुरून पाहणे व पाठलाग करणे यांसारख्या प्रकारांत लक्षणीय वाढ झाली आहे. परिणामी विद्यार्थिनी व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सामाजिक स्वास्थ्यावरही विपरीत परिणाम होत आहे.

विशेष म्हणजे त्रिकोळी येथील एका अल्पवयीन मुलगी गेल्या दीड महिन्यांपासून बेपत्ता असल्याची गंभीर बाबही निवेदनात अधोरेखित करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून संबंधित मुलीचा शोध घेण्यासाठी जलद व सखोल तपास करून तिला सुरक्षित परत आणावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी विशेष पथकाची स्थापना. शाळा, महाविद्यालये, बसस्थानके व गर्दीच्या ठिकाणी नियमित व वाढीव पोलीस गस्त. रोड रोमिओ व टवाळखोरांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून गुन्हे नोंदविणे. छेडछाड, स्टॉकिंग व अपहरण प्रकरणांत POCSO ct अंतर्गत कठोर कारवाई. त्रिकोळी येथील बेपत्ता मुलीच्या प्रकरणाचा एसआयटीमार्फत जलद तपास. शाळा-महाविद्यालयांत जनजागृती व समुपदेशन कार्यक्रम. महिला हेल्पलाईन व तक्रार नोंदणीसाठी गोपनीय यंत्रणा. सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही व्यवस्था कार्यरत ठेवण्यासाठी प्रशासनाशी समन्वय. फाउंडेशनच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, हा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरता मर्यादित नसून समाजाच्या नैतिक व मानसिक आरोग्याशी निगडित आहे. वेळेत ठोस पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या निवेदनावर सत्यनारायण जाधव, ॲड. अर्चना जाधव, राजू भालेराव, करीम शेख, किशोर औरादे, ॲड. ख्वाजा शेख, धानय्या स्वामी, ज्योती माने, शबाना उडचणे-शेख, किशोर बसगुंडे, राजू बटगिरे, प्रदीप मोरे, प्रदीप चौधरी, संतोष चव्हाण, बबीता मदने आदींसह विविध सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान, पोलीस प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन उमरगा परिसरात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## तुळजापूरमध्ये अवकाळी पावसाची हजेरी; भाविक-व्यापाऱ्यांची धांदल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
दुपारी अचानक सुरू झालेल्या पावसामुळे तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी आलेल्या भाविकांसह बाजारपेठेतील व्यापाऱ्यांची एकच धांदल उडाली.

दि.२४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी चारच्या सुमारास अचानक पावसाने हजेरी लावली. अनपेक्षित पावसामुळे भाविक व शहरवासीयांनी मिळेल त्या ठिकाणी आडोसा घेतला. काही काळासाठी शहरातील प्रमुख रस्ते ओस पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. पावसामुळे दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून आले. दर्शन आटोपून बाहेर पडलेल्या भाविकांना रिमझिम पावसातच आपल्या गावी परतावे लागले. वाऱ्यासह पडणाऱ्या पावसामुळे नागरिकांमध्ये अवकाळी पावसाची चर्चा रंगली.

गतवर्षी मे महिन्याच्या सुरुवातीलाच पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे यंदाही पावसाळा लवकर सुरू होणार का, असा सवाल नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे. हवामानातील अचानक बदलामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वेदांच पिकलेल फळ म्हणजेच श्रीमद् भागवत : प्रजापती विष्णुदास

### अखंड हरिनाम सप्ताहात भागवत कथेद्वारे भक्ती-ज्ञानाचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
श्रीमद् भागवत कथा म्हणजे वृक्षरूपी वेदाचे पिकलेले फळ होय. भागवत कथा श्रवण करत राहिल्यास भक्ती वृद्धिंगत होते, अध्यात्मिक ज्ञान प्राप्त होते आणि भौतिक सुखांविषयी वैराग्य निर्माण होते, असे प्रतिपादन इस्कॉन धाराशिव चे श्रीमान प्रजापती विष्णुदास यांनी केले.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, तुळजापूर येथे माऊली महिला भजनी मंडळ, जिजामाता नगर यांच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहातील भागवत कथेत ते बोलत होते.



कलियुग हे दुःखालय, अशाश्वत व मायावी मृगजळाप्रमाणे असल्याचे सांगताना त्यांनी भागवत कथा श्रवणाने मृत्यूची भीती नष्ट होते, अहंकार कमी होतो व भक्त, भक्ती आणि भगवंत यांचा संगम साधला जातो, असे स्पष्ट केले. सप्तदिवसीय भागवत पुराण श्रवणाने अनेकांचा उद्धार झाल्याची उदाहरणेही त्यांनी यावेळी सांगितली.

भागवत कथेसाठी दररोज सुमारे २०० ते २५० भाविक उपस्थित राहत असून दुपारी ३ ते ६ या वेळेत कथा श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता २८ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाने होणार असल्याची माहिती देण्यात आली.

## एनपीएसधारक शिक्षकांना अर्जित रजा रोखीकरणाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**
नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (एनपीएस) योजनेअंतर्गत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती, राजीनामा, नोकरी सोडणे अथवा निधन झाल्यास अर्जित रजेचे रोखीकरण देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद चे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शिक्षण सचिवांकडे केली आहे.

यासंदर्भात कुलकर्णी यांनी मंगळवारी (ता. २४) माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत प्रधान सचिव रणजीत सिंह देओल यांना निवेदन सादर केले.

पत्रात नमूद करण्यात आले आहे की, सन २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या अंशतः व पूर्णतः अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना National Pension System (एनपीएस) लागू आहे.

त्यामुळे त्यांना नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम-१९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (जीपीएफ) योजना लागू होत नाही.



मात्र, वित्त विभागाच्या अवर सचिव अनिता लाड यांनी १४ जून २०२३ रोजी दिलेल्या पत्रानुसार या कर्मचाऱ्यांना नागरी सेवा (रजा) नियम-१९८१ लागू असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जुनी पेन्शन योजनेच्या तुलनेत एनपीएसधारक शिक्षकांना सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ अत्यल्प मिळत असल्याने अर्जित रजेचे रोखीकरण होणे आवश्यक असल्याचे पत्रात नमूद आहे.

सध्या शिक्षण विभागाकडून स्पष्ट आदेश नसल्यामुळे अनेक सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची प्रकरणे प्रलंबित असून त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्यामुळे एनपीएस योजनेअंतर्गत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा रोखीकरणाबाबत तातडीने स्पष्ट आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### जाहीर प्रगटन
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापुर यांचे कार्यालय**

**प्रकरण क्र.८५२/२०२५**

**प्रकरणः - मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत**

अर्जदार **पांडुरंग नामदेव दळवे रा. देवसिंगा तुळ**, ता. तुळजापूर येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांचे **पंजोबा नामे कै. भगवान रामा दळवे** यांचा मृत्यु दिनांक ०५.०२.१९७० रोजी येवती येथे झाला आहे. याबाबत त्यांचे मृत्यु नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर मृत्यु नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय

**स्वाक्षरित/-**
**(प्रियंका लोखंडे)**
**नायब तहसिलदार (महसुल)**
**तहसिल कार्याल, तुळजापुर**

## अग्रलेख...

# दहशतवादाविरुद्ध नवा 'प्रहार'

भारत हा शांतताप्रिय देश असला आणि त्याने कधीही कुणावर आक्रमण केल्याचा इतिहास नसला, तरी भारताचे शत्रू कमी नाहीत. विशेषतः इस्लामचे कट्टरपंथी, नक्षलवादी, ईशान्य भारतातील विभाजनवादी, शेजारच्या देशांतून येणारे घुसखोर अशा अनेक घटकांनी भारताला दशकानुदशके त्रास दिला. त्यामुळे त्यांच्याशी लढणे भारताला भाग होते. ती लढाई भारत सतत लढत आला. ज्यांच्या धर्माचे नाव हे 'शांतते'चे प्रतीक असल्याचे सांगतात, त्यांच्याच हिंसाचाराला आणि जिहादी मानसिकतेला भारताला प्रत्युत्तर देत राहावे लागले. आजही तो प्रतिकार संपलेला नाही. एक मात्र खरे की, दीर्घ काळापर्यंत भारताचा हा दहशतवादविरोधी लढा हा प्रतिक्रियात्मक स्वरूपाचा होता. दहशतवादी घटना घडली की यंत्रणा हलायची, निषेध व्हायचा, चौकशी व्हायची आणि काही काळाने पुन्हा तेच चक्र सुरू व्हायचे. गेल्या दशकभरात हे चित्र बदलले आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार आल्यापासून सर्व प्रकारचे दहशतवादी, विभाजनवादी यांची पाचावर धारण बसली आहे. आता केंद्र सरकारने पहिल्यांदाच दहशतवादाविरुद्ध एक सर्वंकष, सुस्पष्ट आणि बहुआयामी धोरण जाहीर केले आहे आणि त्याचे नाव आहे- प्रहार. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या विचारप्रणालीतील मूलभूत बदलाचे प्रतीक म्हणून या धोरणाचा विचार केला पाहिजे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मंत्रालयाने जारी केलेले प्रहार हे भारताचे पहिले सर्वसमावेशक दहशतवादविरोधी धोरण आहे. दहशतवाद हा केवळ सीमेपार घुसखोरीपुरता मर्यादित नसतो; तो सायबर विश्वात, अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाच्या क्षेत्रांत, सामाजिक माध्यमांत, अगदी कारागृहांच्या भिंतींआडही पसरत असल्याची जाणीव या धोरणातून स्पष्ट होते. जल, थल आणि नभ या तिन्ही आघाड्यांवर भारताला धोका आहे, असे स्पष्ट नमूद करताना ऊर्जा, रेल्वे, विमानतळ, बंदरे, संरक्षण, अवकाश, अणुऊर्जा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र क्षमता विकसित केली जात असल्याचा उल्लेख या धोरणात आहे. हे धोरण प्रतिक्रियात्मक नाही; ते पूर्वतयारीबाबतचे आणि त्यानंतर करावयाच्या कृतीबद्दलचे आहे. दहशतवादाला उत्तर देण्यापुरते नव्हे जन्मण्यापूर्वीच त्याचा निःपात करणे हा या धोरणाचा आत्मा आहे. दहशतवादाच्या प्रश्नावर भारताची भूमिका दीर्घकाळ 'सहनशीलतेची' म्हणून ओळखली गेली. १९९० च्या दशकातला काश्मीर खोऱ्यातील रक्तरंजित काळ, २००१ मधील संसदेवरचा हल्ला, २००८ मधील मुंबईवरील २६/११ हल्ला इत्यादी अनेक घटनांनी देश हादरला होता. मात्र, आंतरराष्ट्रीय दबाव, राजनैतिक इच्छाशक्तीचा अभाव आणि अंतर्गत राजकारण यामुळे ठोस, आक्रमक आणि दीर्घकालीन रणनीतीची कमतरता जाणवत राहिली. २०१४ नंतरच्या काळात मात्र चित्र बदलले. दहशतवादाला 'कायद्याची समस्या' म्हणून नव्हे, तर 'राष्ट्रीय सुरक्षेचे युद्ध' म्हणून पाहिले जाऊ लागले. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक, आर्थिक पुरवठ्यावर घाव, एनआयएला बळकटी, यूएपीए कायद्यात सुधारणा या सर्व पावलांनी धोरणात्मक आक्रमकता दाखवली. आता प्रहारने त्या आक्रमकतेला संस्थात्मक चौकट दिली आहे. त्यामुळे दहशतवादाविरुद्धचा 'प्रहार' हा नवा 'प्रहर' आहे.

या धोरणात ही बाब स्पष्ट केलेली आहे की, कोणत्याही धर्माशी जोडून दहशतवादाकडे पाहिले जात नाही. परंतु सीमेपलीकडून प्रायोजित केल्या जात असलेल्या जिहादी संघटना आणि त्यांचे आघाड्यांचे नेटवर्क भारतात हल्ल्यांचे नियोजन करीत असल्याची बाब दुर्लक्षित करता येण्याजोगी नाही. अल-कायदा आणि इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरिया (इसिस) यांसारख्या जागतिक संघटनांनी भारतात स्लीपर सेल निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची नोंद या धोरणात घेण्यात आलेली आहे. पूर्वी अशा संघटनांचा उल्लेख टाळला जायचा; आता मात्र वास्तवाला तोंड देण्याचे आणि जे जसे आहे, तसे दाखविण्याचे धैर्य केंद्र सरकारने दाखविले आहे. वास्तवाचा स्वीकार केला आणि त्याला नाव दिले की त्यावर उपाययोजना आखणे सोपे होते, हा साधा नियम आहे.

साधारण दशकभरापूर्वी जाहीर झालेल्या लेफ्ट विंग एक्ट्रिमिज्म (एलडब्ल्यूई) राष्ट्रीय कृती आराखड्याने नक्षलवादाच्या मुळांवर प्रहार सुरू केला. सुरक्षा कारवायांसोबत विकासाच्या प्रकल्पांना गती देण्यात आली. रस्ते, मोबाईल टॉवर, बँकिंग सेवा, शिक्षण, आरोग्य या सुविधा नक्षलग्रस्त भागांत पोहोचल्या. एकेकाळी 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखला जाणारा पट्टा आकुंचित पावू लागल्याने नक्षलवादी घाबरले. त्यांचे एकाहून एक असे दिग्गज अतिरेकी नेते आत्मसमर्पण करीत आहेत, हा त्याचा पुरावा. नक्षलवाद हा केवळ बंदुकीने संपत नाही; तो विकासाने संपतो, ही समजूत या धोरणामुळे प्रत्यक्षात उतरविली गेली. जम्मू-काश्मीर भागात गेल्या दशकात मोठे परिवर्तन दिसले. कलम ३७० रद्द केल्यानंतर सुरक्षा आणि विकास या दोन्ही आघाड्यांवर काम झाले. दगडफेक, बंद, वारंवार होणारे दहशतवादी हल्ले यांची तीव्रता कमी झाली. स्थानिक तरुणांच्या भरतीवर अंकुश ठेवण्यासाठी डि-रॅडिकलायझेशन कार्यक्रम राबविले गेले. समुदाय आणि धार्मिक नेत्यांचा सहभाग वाढविण्यात आला. सीमेपलीकडून ड्रोनद्वारे शस्त्रे टाकण्याच्या घटनांना उत्तर म्हणून तंत्रज्ञानाधारित यंत्रणा उभारली गेली.

प्रहार या नव्या धोरणात सायबर हल्ल्यांचादेखील उल्लेख आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीचे हॅकर्स आणि शत्रू राष्ट्रांकडून प्रायोजित गट भारतावर हल्ले करीत आहेत. एन्क्रिप्शन, डार्क वेब, क्रिप्टो वॉलेट या माध्यमांतून निधी पुरवठा आणि संवाद साधला जातो. दहशतवाद आता 'कीबोर्ड'वरूनही चालतो. यासाठी सायबर फॉरेन्सिक क्षमता, डिजिटल ट्रॅकिंग, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि कायदेशीर तज्ज्ञांचा प्रारंभापासून सहभाग या उपायांची रूपरेषा आखली गेली आहे. सीबीआरएनईडी अर्थात रासायनिक, जैविक, किरणोत्सारी, आण्विक, स्फोटक आणि डिजिटल (केमिकल, बायोलॉजिकल, रेडिऑलॉजिकल, न्यूक्लिअर, एक्स्प्लोजिव्ह अँड डिजिटल) धोक्यांवर लक्ष केंद्रित करणे ही या धोरणाची भविष्योन्मुख भूमिका आहे. नव्या काळातील धोके नव्या स्वरूपाचे आहेत. त्यामुळे सायबर विश्वाची तसेच इतर धोक्यांची अशी दखल महत्त्वाची ठरते. प्रहार धोरणातून देशभरात एकसमान रचना उभारण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. प्रक्रियांचे मानकीकरण, माहितीची देवाणघेवाण, संयुक्त सराव यामुळे प्रतिसाद अधिक जलद आणि परिणामकारक होईल, ही त्यामागील भूमिका. नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजंसी (एनआयए) सारख्या संस्थेला अधिक बळ देण्यात आले आहे. पहलगामसारख्या घटनांनंतर राज्यांच्या दहशतवादविरोधी पथकांशी समन्वय वाढविण्यात आला आहे. या नव्या धोरणाचा उद्देश स्पष्ट आहे. तो असा की, दहशतवादी, त्यांचे वित्त पुरवठादार आणि समर्थक यांना निधी, शस्त्रे आणि सुरक्षित आश्रय मिळू नये याची तजवीज करणे. बँकिंग व्यवहारांवर नजर, हवाला

नेटवर्कवर कारवाई, मालमत्ता जप्ती या उपायांनी देशविरोधी नेटवर्क्सचा आर्थिक कणा मोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. पूर्वी हल्ल्यानंतर आरोपी पकडणे हा उद्देश असे; आता हल्ला होऊच न देणे आणि त्यामागील अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करणे ही भूमिका आहे. आगामी काळात दहशतवाद अधिक तंत्रज्ञानाधारित होईल. ड्रोन, रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डीपफेक या माध्यमांतून अस्थिरता निर्माण केली जाईल. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांना सातत्याने अद्ययावत राहावे लागेल. अशा स्थितीत आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक सहकार्य वाढविणे अपरिहार्य आहे. त्याची व्यवस्था या धोरणात आहे. भारताने दहशतवादाबद्दल 'शून्य सहिष्णुता' (झिरो टॉलरन्स) ही भूमिका स्पष्ट केली आहे. दहशतवादाला धर्म, जात, प्रदेश यांचे लेबल लावून गोंधळ निर्माण करण्याऐवजी त्याला राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न म्हणून हाताळणे, ही अतिशय परिपक्व भूमिका आहे. त्यामुळे हे नवे धोरण म्हणजे भारताच्या आत्मविश्वासाचा दस्तऐवज आहे. दहशतवादाविरुद्धचा लढा अजून संपलेला नाही; पण दिशा स्पष्ट आहे, इच्छाशक्ती ठाम आहे आणि यंत्रणा सज्ज आहे. राष्ट्राच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड नाही, हा संदेश जगाला आणि देशांतर्गत घटकांनाही दिला गेला आहे, हे प्रहारचे वैशिष्ट्य. 'घर में घुस के मारने वाला' भारत म्हणतात तो हाच!


## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# 'ग्रेट निकोबार'च्या विकासाचा मार्ग मोकळा

ग्रेट निकोबार बेटाच्या मेगा प्रकल्पात आंतरराष्ट्रीय ट्रान्स-शिपमेंट बंदर, ग्रीनफिल्ड विमानतळ, ऊर्जा प्रकल्प व आधुनिक टाऊनशिपचा समावेश आहे. हा केवळ विकासाचा प्रकल्प नाही, तर भारताच्या भावी आर्थिक, सामरिक आणि पर्यावरणीय दिशेचा कसोटीपट आहे. या प्रकल्पाचा सर्वात मोठा लाभ म्हणजे आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारात भारताची भूमिका मजबूत होणे. मलाक्का सामुद्रधुनीजवळील स्थानामुळे ग्रेट निकोबार जागतिक व्यापारमार्गाच्या केंद्रस्थानी आहे. सध्या भारतातील मोठ्या प्रमाणातील कंटेनर ट्रान्स-शिपमेंट कोलंबो, सिंगापूर किंवा इतर विदेशी बंदरांमार्फत होते. नवीन बंदर उभारल्यास हा खर्च आणि अवलंबित्व कमी होऊ शकते. या प्रकल्पामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूक वाढू शकते. स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती होऊ शकते. अंदमान-निकोबार बेटसमूहाचा पायाभूत विकास वेगाने होऊ शकतो. विमानतळ आणि टाऊनशिपमुळे पर्यटनालाही चालना मिळू शकते. दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या या प्रदेशाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जाते. 'ग्रेट निकोबार'चे स्थान भारताला हिंद महासागरातील सामरिक वर्चस्वासाठी मोठी संधी देते. मलक्का सामुद्रधुनी ही जगातील सर्वाधिक व्यापारी जहाजे वापरत असलेली जल वाहतूक मार्गिका आहे.

भू-राजकारणाच्या पटावर हा प्रकल्प केवळ आर्थिक नसून राष्ट्रीय सुरक्षेचा भाग ठरतो; मात्र विकासाच्या या चमकदार आराखड्यामागे गंभीर प्रश्नही आहेत. ग्रेट निकोबार हे समृद्ध वर्षावन, प्रवाळी भत्ती आणि दुर्मिळ प्रजातींचे आश्रयस्थान आहे. मोठ्या प्रमाणावर जंगलतोड आणि जमिनीचे रूपांतर यामुळे परिसंस्थेचे संतुलन बिघडण्याची भीती व्यक्त केली जाते. शोम्पेन आणि निकोबारी या आदिवासी जमातींचे पारंपरिक जीवन या भूमीशी घट्ट जोडलेले आहे. त्यांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक अस्तित्वावर होणारा परिणाम हा केवळ विकासाचा 'साईड इफेक्ट' म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. प्रकल्प शास्त्रीय अभ्यास, पारदर्शक पर्यावरणीय मूल्यांकन आणि स्थानिक समुदायांच्या सहभागासह राबविला गेल्यास शाश्वततेचा आदर्श ठरू शकतो, पण पर्यावरणीय अटी केवळ कागदोपत्री राहिल्यास दीर्घकालीन नुकसान अटळ ठरेल. हवामान बदल, समुद्रपातळीतील वाढ आणि भूकंपीय संवेदनशीलता लक्षात घेता या बेटावरील वसाहती अत्यंत काळजीपूर्ण नियोजनाची मागणी करतात. 'ग्रेट निकोबार मेगा प्रकल्प' हा भारताच्या विकासाच्या मॉडेलची परीक्षा आहे. आर्थिक आणि सामरिक लाभ नाकारता येणार नाहीत; परंतु त्यासाठी पर्यावरणीय व सामाजिक किंमत किती मोजावी लागेल, हा प्रश्न आहेच.



विकास आवश्यक आहे, परंतु तो विवेक, विज्ञान आणि न्याय या तिन्हींच्या आधारावरच टिकाऊ ठरतो. 'ग्रेट निकोबार'चा निर्णय केवळ एका बेटाचा प्रश्न नाही, तर भारताने कोणत्या प्रकारच्या विकासाचा मार्ग स्वीकारायचा आहे, याचे द्योतक आहे. भविष्यकाळात इतिहास या प्रकल्पाकडे कशा नजरेने पाहील, हे आज घेतल्या जाणाऱ्या निर्णयांवर अवलंबून आहे. या पृष्ठभूमीवर राष्ट्रीय हरित लवादाने केंद्र सरकारच्या ९० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या 'ग्रेट निकोबार बेटा'वरील मेगा प्रकल्पाला मंजुरी दिली आणि पर्यावरणीय परवानग्यांमध्ये पुरेशा संरक्षणात्मक उपाययोजना असल्याचे नमूद केले. न्यायाधिकरणाने २०२२ मध्ये दिलेल्या पर्यावरणीय मंजुरीला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळून लावताना सांगितले की, लादलेल्या अटी आणि सुरक्षात्मक उपाय प्रकल्पामुळे होणाऱ्या संभाव्य पर्यावरणीय परिणामांना सामोरे जाण्यास पुरेसे आहेत. सहा सदस्यीय विशेष खंडपीठाने नमूद केले की, पर्यावरणीय मंजुरी देताना संबंधित सर्व मुद्यांचा सखोल विचार करण्यात आला होता आणि या प्रक्रियेत कोणतीही गंभीर त्रुटी आढळत नाही. हा प्रकल्प सुमारे १६६ चौरस किलोमीटर क्षेत्रात विकसित केला जाणार असून त्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ट्रान्सशिपमेंट बंदर, द्वै-उपयोगी (नागरिक आणि संरक्षणासाठी) विमानतळ, वीज निर्मिती प्रकल्प आणि नियोजित टाऊनशिपचा समावेश आहे.

न्यायाधिकरणाने असेही स्पष्ट केले की, या प्रकल्पामुळे विशेषतः मलाक्का सामुद्रधुनीजवळील भारताची सामरिक क्षमता वाढेल. त्याच्या भौगोलिक स्थानामुळे हिंद महासागर क्षेत्रात भारताचे स्थान अधिक मजबूत होईल. पर्यावरणीय दृष्टीने संवेदनशील भाग असल्यामुळे प्रकल्पासाठी काही कठोर अटी घालण्यात आल्या आहेत. त्यात संकटग्रस्त प्रजातींचे संरक्षण, किनारपट्टी संवर्धन तसेच परिसंस्थेचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा समावेश आहे. या प्रकल्पाविरोधात मुद्दे उपस्थित करणाऱ्या दाव्यात याचिकाकर्त्यांनी पर्यावरणीय तसेच आदिवासी समुदायांवरील संभाव्य परिणामांचा मुद्दा उपस्थित केला होता; मात्र उच्चस्तरीय समितीने या मुद्यांचा विचार करून योग्य अटींसह मंजुरी दिली असल्याचे न्यायाधिकरणाने नमूद केले. या निर्णयानंतर राजकीय प्रतिक्रिया उमटल्या असून काही पक्षांनी हा निर्णय पर्यावरणविरोधी असल्याची टीका केली, तर सरकारने याला भारताच्या आर्थिक आणि सामरिक प्रगतीसाठी महत्त्वाचे पाऊल संबोधले. एकूणच राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयामुळे ग्रेट निकोबार मेगा प्रकल्पाला पुढे जाण्यास मार्ग मोकळा झाला आहे, परंतु पर्यावरणीय अटींचे काटेकोर पालन करणे ही प्रकल्प राबविणाऱ्यांसाठी अत्यावश्यक जबाबदारी राहणार आहे.

हा प्रकल्प केवळ पायाभूत सुविधांची उभारणी नसून हिंद महासागरातील भारताच्या सामरिक उपस्थितीचा दीर्घकालीन आराखडा मानला जातो; परंतु विकासाच्या या ध्यासामागे पर्यावरणीय संवर्धन, स्थानिक आदिवासींचे हक्क आणि जैवविविधतेचे रक्षण या प्रश्नांची छाया कायम आहे. ग्रेट निकोबार बेट हे 'युनेस्को बायोस्फिअर रिझर्व्ह'चा भाग आहे. येथे हजारो हेक्टर प्राथमिक वर्षावने आहेत. प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड अपेक्षित आहे. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, बेटावरील परिसंस्था अत्यंत नाजूक आहे. २००४ च्या त्सुनामीने या प्रदेशाला दिलेला तडाखा अजूनही स्मरणात आहे. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर मानवी वसाहत आणि औद्योगिक प्रकल्प उभारणे पर्यावरणीय जोखमीचे ठरू शकते. शोम्पेन आणि निकोबारी या आदिवासी या समुदायांचे जीवन जंगलाशी आणि समुद्राशी निगडित आहे. प्रकल्पामुळे त्यांच्या पारंपरिक जीवनपद्धतीवर परिणाम होणार नाही का, हा गंभीर प्रश्न उपस्थित होतो. भारताचे संविधान आणि विविध कायदे आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण करतात. विकासाच्या नावाखाली त्यांच्या भूमीवर अतिक्रमण होणे किंवा त्यांचे सांस्कृतिक अस्तित्व धोक्यात येणे, हे लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना बाधा आणणारे ठरते. हिंद महासागर क्षेत्रातील स्पर्धा तीव्र होत असताना, भारताने आपली पायाभूत क्षमता वाढविणे आवश्यक आहे, हे नाकारता येणार नाही; परंतु शाश्वत विकासाचा सिद्धांत केवळ घोषणेत न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीत उतरायला हवा. प्रकल्प राबवायचाच असेल तर त्यासाठी पारदर्शक पर्यावरणीय मूल्यांकन, स्थानिक समुदायांशी सखोल सल्लामसलत आणि जैवविविधतेच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. केवळ आर्थिक फायद्याच्या आकड्यांनी विकासाचे समर्थन करणे पुरेसे नाही. 'ग्रेट निकोबार मेगा प्रकल्प' हा भारताच्या भविष्यातील विकासाच्या मॉडेलची कसोटी ठरणार आहे. हा प्रकल्प पर्यावरणीय संतुलन, सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय हीत यांचा समतोल साधत राबविला गेल्यास आदर्श उदाहरण ठरू शकतो. अन्यथा, तो निसर्ग आणि स्थानिक संस्कृतीवर उमटलेली अपरिवर्तनीय जखम ठरेल. विकास आवश्यक आहे; परंतु तो विवेकाने, विज्ञानाधारित दृष्टिकोनातून आणि मानवी मूल्यांचा सन्मान राखूनच साध्य व्हायला हवा. 'ग्रेट निकोबार'चा प्रश्न केवळ एका बेटाचा नाही. तो भारताच्या विकास दृष्टीचा आरसा आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# नागपूर-अमरावती रस्ता मेफेड्रॉनचा कॉरिडॉर

मेफेड्रॉन (एमडी) हे नशा करणाऱ्या अमली पदार्थाचे नाव आता घरोघरी पोहोचले आहे. एमडीच्या विक्रीचा धंदा चांगलाच फोफावला आहे. त्यासाठी नागपूर-अमरावती हा रस्ता कॉरिडॉर म्हणून वापरला जात आहे. याच मार्गावरच्या कारंजा घाडगे येथे काही दिवसांपूर्वी महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकाला एमडी तयार करण्याचा कारखानाच सापडला होता. येथे १२८ किलो मेफेड्रॉन जप्त करण्यात आले होते. या कारखान्यातला माल नागपूर व अमरावती मार्गे राज्याच्या अन्य भागात पोहोचविला जात होता. सदर दोन्ही शहरे एमडी तस्करीची प्रमुख केंद्र झाली आहेत. येथूनच अन्य जिल्ह्यांमध्ये एमडी पोहोचविली जाते. अन्य राज्यातही या तस्करांचे नेटवर्क आहे. याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महसूल गुप्तचर संचालनालयाने अमरावती शहरातही छापा टाकला होता. ५ किलो एमडी सदर पथकाने जप्त करून काही जणांना ताब्यात घेतले होते. या कारवाईसाठीची आवश्यक माहिती कारंजा प्रकरणातील तपासातून मिळाली होती. कारंजातून कुठे आणि कोणाकडे माल जात होता, याची संपूर्ण माहिती यंत्रणेला मिळाली आहे. त्या आधारावरच त्याचा तपास सुरू आहे. कारंजा व अमरावतीच्या या दोन मोठ्या कारवायांमुळे एमडी तस्करांच्या मनसुब्यांना धक्का बसला; पण जाळे मात्र उद्ध्वस्त झालेले नाही. अमरावती शहरासह अन्य शहरांमध्येही सलग एमडी जप्त करण्याच्या होत असलेल्या कारवाई, त्याचे द्योतकच मानावे लागेल. नागपूर-अमरावती मार्गावरून अतिशय बेमालूमपणे एमडीची वाहतूक होते. पण, एकदाही या मार्गावर कारवाई झालेली नाही. राज्यातल्या मुंबई, पुणे या मोठ्या शहरांमध्ये पसरलेले एमडीसह अन्य प्रकारच्या मादक ड्रग्सचे लोण आता छोट्या शहरांमध्येही पसरायला लागले आहे. ड्रग्सच्या या विळख्यात तरुण-तरुणी मोठ्या प्रमाणात अडकत असल्याचे वास्तव आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये झालेल्या अनेक कारवायांमधून ते स्पष्ट झाले आहे. एमडीचे सेवन करणाऱ्यांची संख्या वाढते आहे. दोन वर्षांपूर्वी अमरावतीत एक कारवाई झाली होती; त्यावेळी झालेल्या तपासात अमरावतीत येणारे ड्रग्स हे मुंबईतून येत असल्याचे समोर आले होते. या धंद्यात एक मोठे रॅकेट सक्रिय आहे. मुंबई त्याचे मुख्यालय असले, तरी धंद्याच्या दृष्टीने आणि धोके टाळण्यासाठी विदर्भातले नागपूर व अमरावती हे त्याचे विभागीय केंद्र झाले आहे. एमडीच्या धंद्यात दोन साखळ्या तयार झाल्या आहेत. एक व्यवसाय करणाऱ्यांची तर दुसरी साखळी शौकिनांची आहे. प्रत्येक शहरात अशा दोन साखळ्या आहेत. असंख्य तरुण या दोन्ही साखळीच्या कड्या होत आहेत. त्यात महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांचे (यात मुलींचाही समावेश आहे) प्रमाण सर्वाधिक आहे. मोठ्या शहरांमधला हा शौक आता छोट्या शहरांमध्ये फोफावल्यामुळे तो सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे. त्यातून अनेक समस्या निर्माण होत असून गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. नशेचे अनेक प्रकार आहेत. अफू व त्यापासून तयार केलेले मॉर्फिन, हेरॉईन इत्यादी तर कोकेन, भांग, गांजा, चरस, ब्राऊन शुगर तसेच स्पिरीटचाही नशेसाठी उपयोग होतो. अतिशौकीन लोक सिंथेटिक अमली पदार्थ आणि आता घातक जीवघेणा एमडीचा (मेफेड्रॉन) वापर करतात. मॉर्फिन, हेरॉईन, कोकेन, चरस, ब्राऊन शुगर याची नशा महागडी असून त्या खालोखाल एमडीचा नंबर लागतो. त्याकडे तरुणांचा कल वाढत आहे. एमडीची खरेदी-विक्री सांकेतिक भाषेत होते, हे विशेष!



एमडीसह अन्य नशेली ड्रग्सच्या व्यसनामुळे अनेक तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आणि काहींचे होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. सुरुवातीला आवाक्यात असणारी ही नशा केव्हा अनियंत्रित होते, हे घेणाऱ्यालाही कळत नाही. हा शौक जीवघेणा आहे. एमडीची ही समस्या हळूहळू व्यापक स्वरूप घेत आहे. सरकार, पोलिस यंत्रणेला त्याकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. प्रत्येक शहरातले ड्रग्सचे शौकीन आणि त्यांना ड्रग्स पोहोचविणाऱ्यांची साखळी शोधून ती खंडीत करावी लागेल. मोठ्या शहरांमध्ये बसलेले तस्करही शोधावे लागतील. त्यांचे तस्करीच्या अनुषंगाने असलेले अन्य कनेक्शन ब्रेक करावे लागतील. हजारो कोटींच्या उलाढालीच्या या धंद्याची पाळेमुळे खूप खोलवर रुजली आहेत. पोलिसांच्या मर्यादा लक्षात घेऊन महसूल गुप्तचर संचालनालयाने त्यात डोके घातले आहे. त्यांनाही एका क्षणात सर्व शोधून नष्ट करणे शक्य नाही. एक मोठे अभियान त्यासाठी हाती घ्यावे लागणार आहे. प्रबळ इच्छाशक्तीशिवाय ते शक्य नाही. सरकार आणि प्रशासकीय यंत्रणेकडूनच सर्वांना अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# श्रीलिंगपुराण

लिंगपुराण भगवान शिवशक्ती ऐक्याचे प्रतीक आहे. पुराण भगवंताच्या अठरा पुराणमय शरीराचा विग्रह तयार केला तर लिंगपुराण त्या विग्रह म्हणजे मूर्तीचा गुल्फ प्रदेश आहे. त्यासाठी 'लैंगं तू गुल्फकमब' असा उल्लेख आहे. लिंग हे प्रतीक असून वैशेषिक ग्रंथात याबाबत निवेदन आहे. ते प्रकृती पुरुषात्मक शिव पार्वती स्वरूप आहे. 'लिंगं वेदी महादेवी लिंगं साक्षन्महेश्वर' म्हणजे शिवलिंगाची वेदी, जिला काही ठिकाणी शाळुंका म्हणतात, ती पार्वती स्वरूपा आहे. म्हणूनच तेथे वेदीवर हळदी-कुंकू लावून पार्वती पूजन केले जाते. उभे लिंग हे भगवान शिव स्वरूप असून तेथे जलाभिषेक केला जातो. लिंगपुराणानुसार-

'अलिंगो लिंगमुलं तू अव्यक्तं लिंगमुच्यते ।
अलिंग: शिव इत्युक्तो लिंगं शैवमिती स्मृतं ॥'

अलिंग म्हणजे निर्गुण शिव आणि प्रकृती म्हणजे सगुण शिवलिंग आहे. थोडक्यात शिवाचे एक लिंग स्वरूप आहे, दुसरे अलिंग स्वरूप आहे आणि तिसरे या दोघांच्याही अतीत असे लिंगालिंग स्वरूप म्हणजे ते परमतत्त्व. अजून सोप्या भाषेत सांगायचे तर एक शिवतत्त्व जे निर्गुण निराकार आहे. ज्योतिर्लिंग म्हणजे निर्गुण साकार आणि महादेवाच्या मूर्ती विग्रह म्हणजे सगुण साकार शिवतत्त्व होय. ब्रह्मांड व्याप्त शिवतत्त्व हे साकार लिंगरूपात नटलेले आहे. हेच लिंगपुराण पटवून देते. लिंग पुराण दोन भागात विभागले आहे. पूर्व भागात १०८ अध्याय तर उत्तर भागात ५५ असे एकूण १६३ अध्याय सध्या उपलब्ध आहेत. लिंगपुराणाचे विशाल स्वरूप प्रारंभीच दिले आहे.

एकदा देवर्षी नारद नैमिषारण्यात पोहोचले असता तेथे त्यांनी सुत महामुनींना पाहिले. सुत महाशयांनी देवर्षी नारदांच्या उपस्थितीत सर्व शौनकादी ऋषिमुनींना लिंगपुराण सांगितले. प्रथम त्यांनी लिंगपुराणाची व्याप्ती सांगताना पहिले लिंग पुराणाचे एक कोटी श्लोक होते. त्यानंतर ते चार लाख संख्येत उपलब्ध राहिलेत. पुढे ते केवळ ११ हजार संख्येत राहिलेत; जे आजही उपलब्ध आहेत. लिंगपुराणात सृष्टीची निर्मिती, मनु आणि शतरुपा उत्पत्ती, मैथुनी सृष्टी वर्णन दिले आहे. शिवलिंग प्राकट्याची अद्भुत कथा सुतांनी विशद केली. अलिंग तथा लिंगतत्त्व स्वरूप आणि महेश्वर शिव महिमा त्यांनी सांगितला. महेश्वर योगावतार वर्णन, आपल्या शरीरातील योग स्थाने, विविध चक्रे, सदाशिव ध्यान, पाशुपत योग, शिव साक्षात्कार, शिवस्वरूप सद्योजातं महिमा, भगवान वामदेव स्वरूप, तत्पुरुष, अघोर रूप ,ईशान स्वरूप इत्यादी रुद्राध्यायीतील स्वरूप वर्णन लिंग पुराणात आहे. ज्योतिर्मय महालिंग प्राकट्य, महालिंगाच्या मूळस्थानाचे शोधन, लिंगमध्यात उमामहेश्वर तथा उपरोक्त ईशानादी शिवरूप उत्पत्ती या पुराणात आहे. लिंगपूजनाची परंपरा प्रारंभ, शिवयोगी वर्णन, लिंगपूजा विधी इथे दिली आहे. सुदर्शन मुनी, श्वेतमुनी यांच्याद्वारा शिवभक्ती उपदेश, महर्षी दधीची द्वारा महामृत्युंजय मंत्र महात्म्य, नंदीचा जन्म, नंदिकेश्वर शिव इत्यादी वर्णन.

ब्रह्मर्षी वशिष्ठ पुत्र शक्ती, महर्षी पाराशर, शिवभक्त तंडीप्रोक्त, ययाती, ययातीपुत्र यदू, यदूचा वंश, चंद्रवंश, भगवान श्रीकृष्ण अवतार अशा विविध कथा इथे आलेल्या आहेत. तारकासुर, त्याचे पुत्र विद्युन्माली, तारकाक्ष, कमलाक्ष यांचे वर्णन त्यानंतर त्रिपुरासुर वधासाठी भगवान शंकराची प्रार्थना, त्रिपुरासुर वध. पुढे ब्रह्मदेवांकडून विभिन्न लिंग निर्माण आणि पूजन, शिव मंदिर निर्माण महात्म्य तदनंतर कैलासपुरीला जाऊन देवतांनी केलेले शिवपूजन, शिवव्रत आणि पंचाक्षरी मंत्रमहिमा लिंगपुराणात आहे. वाराणसी क्षेत्र महिमा, जालंधर वध, भगवान शिवाच्या अष्टमूर्ती शर्व, भव इत्यादींचे वर्णन. शिवलिंगासमोर अघोरार्चन इत्यादी बाबी या पुराणात आहेत. लिंगपुराणात ज्योतिर्लिंग उत्पत्तीची गोड कथा दिली आहे. भगवान विष्णू आणि भगवान ब्रह्मदेव यांच्यात श्रेष्ठतेवरून वाद विकोपाला गेला तेव्हा दोघांचाही कलह दूर करण्यासाठी आणि त्यांना ज्ञान प्रदान करण्यासाठी भगवान शिवांनी एक दीप्तिमान अग्निस्तंभ निर्माण केला, ज्याला ज्योतिर्लिंग म्हणतात.

'ज्वालामालासहस्राढ्यम् कालानलशतोपमम् ।
क्षयवृद्धिविनिर्मुक्तमादीमध्यान्तवर्जितम् ॥'

भगवान विष्णू आणि भगवान ब्रह्मदेवांनी अचंबित होऊन या ज्योतिर्लिंगाच्या टोकापर्यंत जाण्याची आपसात चर्चा केली. भगवान विष्णू वराह रूप घेऊन खालच्या टोकापर्यंत निघाले. ब्रह्मदेव हंस रूपाने वरच्या टोकापर्यंत निघाले. दोघांनाही ज्योतिर्लिंगाचा थाग लागला नाही. भगवान विष्णूंनी ते प्रामाणिक सांगितले. पण ब्रह्मदेवांनी मला ज्योतिर्लिंगाचे टोक सापडल्याचे मिथ्या विधान केले. त्यामुळे भगवान शिवमहादेव ज्योतिर्लिंगातून प्रकट झाले. भगवान विष्णूंच्या प्रामाणिक वर्तनावर प्रसन्न होऊन भगवान शिवांनी त्यांना सर्वपूजेचा मान दिला. मात्र, ब्रह्मदेवाच्या मिथ्या विधानाने नाराज होऊन ब्रह्मदेवाची पूजा कुठेच होणार नाही, असा शाप दिला. ज्योतिर्लिंगातून ओंकार ध्वनी येत होता. ते ज्योतिर्लिंग म्हणजे महादेवाची पिंड होय. तेव्हापासून भगवान महादेवाचे रूप म्हणून ज्योतिर्लिंग पूजनाला सुरुवात झाली.

'ईशानमीशमुकुटं पुरुषास्यं पुरातनम् ।
अघोरहृदयं हृद्यं वामगुह्यं सदाशिवम् ।
सद्यः पादं महादेवं महाभोगीन्द्रभूषणम् ॥'

लिंगपुराणातील हा श्लोक भगवान शिवाचे स्वरूप मंत्र महात्म्य सांगतो. रुद्राध्यायीतील १) ईशान : सर्व विद्यानाम २) तत्पुरुषाय विद्महे ३) अघोरभ्यों थ घोरेभ्य ४) सद्योजातं प्रपद्यामि ५) वामदेवाय नमो हे मंत्र विदित आहेत. भगवान विष्णूंनी या मंत्रांचा जप केला आहे तेव्हापासून हे मंत्र सिद्धमंत्र झालेत.

'त्रियम्बकं यजामहे त्रैलोक्यपितरं प्रभुम ।
त्रिदेवस्य महादेवं सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ॥'

लिंगपुराणातील हा श्लोक महामृत्युंजय मंत्राचे महात्म्य सांगतो. लिंगपुराणात इतर पुराणांप्रमाणेच सृष्टीची उत्पत्ती, कालगणना, दशावतार, शैव वैष्णव समन्वय आहेच; पण ज्योतिर्लिंग, ज्योतिर्लिंगाची उपासना याबाबत अद्भुत आणि अलौकिक बाबींचा उलगडा आहे.

थोडक्यात लिंगपुराण भगवान शिवाची महती सांगतानाच त्याचे सामान्य शिवउपासकांना परिणामकारक आणि सकारात्मक फायदे कसे मिळतील, याचे प्रासादिक कथन करते. शिवशक्ती ऐक्यरूप म्हणजे अद्भुत श्रीलिंगपुराण आहे.

९८२२२६२७३५

## रोखठोक विचार

'प्रस्तावनेचे नवे पान' हा 'रोखठोक'मधील लेख विरोधकांचे कर्तव्य व त्यांचे विपरीत वर्तन याचा योग्य समाचार घेतो. सदन कुठलेही असो; लोकसभा वा विधानसभा; अधिवेशनाच्या आधीच्या चहापानात विरोधकांनी सहभाग घेण्याचा शिष्टाचार आहे आणि त्यातूनच सत्ताधारी व विरोधक एकमेकांना जोडत असतात. पण गेली अनेक वर्षे विरोधकांनी अधिवेशनाच्या आधीच्या चहापानावर बहिष्कार टाकण्याची परंपरा निर्माण केली आहे आणि सर्वांमध्ये गोंधळ घालून कामकाजावर बहिष्कार तरी टाकायचा वा कामकाज बंद करायला भाग पाडायचे, हेच चालले आहे. यामुळे कुठल्याही विषयावर सदनात चर्चा होत नाही. नंतर सरकारने कुठलाही निर्णय घेतला की, त्यावर रान उठवायला विरोधक तयार असतात. लोकशाहीत सत्ताधारी व विरोधक दोघांनीही समतोल साधत राज्याचा विकास करायचा असतो, पण ती जाण आताच्या विरोधकांना नाही हे दुर्दैव आहे.

**माया हेमंत भाटकर** /९८६९०७४४९९

## स्वराज्याच्या अस्मितेवर हल्ला



आज महाराष्ट्र पाहतोय की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत छत्रपती शिवरायांच्या 'हिंदवी स्वराज्याचा' प्रखर विचार घेऊन लढणाऱ्या मावळ्यांनी विजय मिळविला आहे. हा विजय केवळ सत्तेचा नाही, तर तो हिंदू अस्मितेचा आणि त्या रक्ताचा विजय आहे, ज्या रक्तात आजही शिवरायांची निष्ठा वाहतेय. पण... हा विजयाचा गुलाल डोळ्यांत जाता कामा नये, कारण याच महाराष्ट्राच्या मातीत आजही 'मोगलांच्या औलादी' जिवंत आहेत! सावधान! 'धर्मनिरपेक्षतेचे' पाकधार्जिने तुमचे रक्त शोषत आहे! आज काही राजकीय शक्ती 'सर्वधर्मसमभाव' आणि 'धर्मनिरपेक्षतेचा' मुखवटा घालून हिंदू समाजाच्या मुळावर उठल्या आहेत. हे लोक तोंडाने समतेच्या गप्पा मारतात, पण प्रत्यक्षात केसाने हिंदूंचा गळा कापण्याचे नीच

## वाचक पत्रे

कारस्थान रचत आहेत. सावध व्हा, ही आधुनिक मोगलाई अत्यंत घातक आहे. ज्या मालेगावच्या सत्ताकेंद्रावर बसताच हजारो हिंदूंची कत्तल करणाऱ्या, मंदिरे उद्ध्वस्त करणाऱ्या आणि सक्तीने धर्मांतर घडवणाऱ्या क्रूरकर्मा टिपू सुलतानची प्रतिमा महापौरांच्या भिंतीवर लागते, तिथे महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान झाला आहे. छत्रपतींच्या महाराष्ट्रात अशा नराधमांचे उदात्तीकरण होणे, हे आपल्या अध:पतनाचे लक्षण आहे. सत्तेची ऊब मिळताच या प्रवृत्ती आपली खरी 'मोगली' रूपे दाखवू लागल्या आहेत. हा धोका आता आपल्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. जगाचे वंदनीय दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांची तुलना त्या धर्मांध आणि क्रूर टिपूशी करणाऱ्या नेत्यांची आणि पक्षांची वैचारिक दिवाळखोरी चव्हाट्यावर आली आहे. सूर्याची तुलना काजव्याशी करण्याचे हे धाडस येते कुठून? अशा नेत्यांना आणि त्यांच्या पक्षाला त्यांची लायकी दाखवून देण्याची वेळ आता आली आहे. अशांना सत्तेच्या गादीवरून खाली खेचणे, हीच खरी शिवभक्ती ठरेल. नवनियुक्त मावळ्यांनो, लक्षात ठेवा... हा विजय केवळ खुर्चीवर बसण्यासाठी मिळालेला नाही. तुमच्या खांद्यावर आता हिंदू धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाची मोठी जबाबदारी आहे. जिथे जिथे ही मोगली प्रवृत्ती डोके वर काढेल, तिथे तिथे तिला ठेचून काढा. सत्तेचा वापर करून हिंदूंच्या अस्मितेचे रक्षण करा. सर्वधर्मसमभावाच्या अफूच्या गोळ्या देणाऱ्यांना ओळखा, कारण त्यांच्या हातातील सुरा आपल्याच गळ्यासाठी सज्ज आहे. महाराष्ट्र आता फक्त निवडणुका जिंकणारे नेते शोधत नाहीये, तर महाराष्ट्राला आता गरज आहे ती वाघाच्या काळजाच्या धर्मरक्षक, राष्ट्ररक्षक मावळ्यांची!

**अमोल तपासे**/नागपूर

## परीक्षा अन् स्पर्धा

सध्या बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत. रोज बातम्या वाचून खंत वाटते. विद्यार्थी म्हणजे ग्रहण करणे, मनन-चिंतन करणे, मन एकाग्र करून अभ्यास करणे. नंतर परीक्षा देणे. त्यात



गैरप्रकार करणे चुकीचेच आहे. इतर राज्यातही पाच मिनिटे उशीर झाला म्हणून गेट बंद केले. परीक्षा देता आली नाही. अशीही शिक्षा नको. एखाद्याची कॉपी पकडली जाते. पेपर फुटतात. आम्ही शिकत होतो, तेव्हा पेपर फुटल्याची केवळ अफवा पसरायची. आता मात्र खरंच पेपर फुटतात, हे ऐकून वाईट वाटते. शिक्षण क्षेत्राशी संबंधित नोकरी असल्याने अशा बातम्यांनी अधिक त्रास होतो. मान्य आहे, स्पर्धा आहे. प्रामाणिकपणेच परीक्षा द्या. यशही वाट पाहते आहे, हे लक्षात असू द्या विद्यार्थी मित्रांनो!

**अंजली पळणीटकर**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच <u>**कुठलाही लेख**</u> पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हमीभाव कापूस सी.सी.आय खरेदीची मुदत एप्रील २०२६ अखेर करावी

## राजकिशोर मोदी ॲड.विष्णुपंत सोळंके यांची मागणी

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** कापूस खरेदी हंगाम २०२५-२०२६ मध्ये कापूस उत्पादीत शेतकऱ्यांचे कापसाला किमान आधारभुत किंमत (हमीभाव) योजनेत राज्यातील कापूस खरेदी अंतर्गत सी.सी.आयकडून कापूस खरेदीची अंतीम तारिख २७/०२/२०२६ देण्यात आलेली आहे. राज्यातील असंख्य कापूस उत्पादीत शेतकऱ्यांचा कापुस विक्रीसाठीचे सी.सी.आयचे अनेक तांत्रिक आणि नेटवर्कच्या कारणांमुळे खूप मोठा कापूस अद्याप ही विक्री करणे राहिलेला आहे. हंगाम सुरूवातीचे लांबलेल्या पावसामुळे कापूस हंगाम विस्कळीत झाला आहे. तसेच विक्रीसाठी सी.सी. आयकडे आणण्यासाठी शेतकऱ्यांनी कपास किसान ॲपवर नोंदणी करण्यासाठीची



तारीख ३० डिसेंबर २०२५ ठेवली होती. असंख्य शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे ती पुढे १५ जानेवारी २०२६ पर्यंतच करणेत आली. आजही असंख्य शेतकरी हे नोंदणी अभावी सी.सी.आयकडे त्यांचा उत्पादीत कापूस विक्रीसाठी आणु शकत नसल्यामुळे अशा शेतकऱ्यांचे खूप नुकसान होत असल्यामुळे शेतकऱ्यांना कपास किसान ॲपवर नोंदणी करणेची मुदत ही यापुढे ३० एप्रील २०२६ पर्यंत करणेत यावी. अशी मागणी महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी व संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी व संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी नमूद केले आहे की, सी.सी.आय कापूस खरेदी हमी भाव प्रति क्विंटल रू.८०००/- एवढा असून सध्या बाजारात कापूस खरेदी प्रति क्विंटल रूपये ७३०० ते ७५००/- एवढी चालु आहे. शेतकऱ्यांना सी.सी.आय कापूस विक्रीसाठी मुदत वाढवून ३० एप्रील २०२६ पर्यंत वाढवून दिली नाही तर बाजारातील कापसाचे भाव प्रति क्विंटल भाव ७०० रूपयांपर्यंत ही कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याबाबत सी.सी.आयकडे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, सहकारमंत्री ना.बाबासाहेब पाटील यांचेकडे निवेदन देवून सोमवार, दि. २३/०२/२०२६ रोजी आम्ही मागणी केलेली आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी व संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी दिली आहे.

# बीड जिल्ह्यातील ठेवीदारांच्या आंदोलनाला न्याय्य मागण्यांना आ. धस यांचा जाहीर पाठिंबा

**बीड |** ज्ञानराधा, राजस्थानी, साईराम मॉंसाहेब जिजाऊ, मराठवाडा अर्बन (माजलगाव), लक्ष्मीमाता अर्बन, छत्रपती, मुक्ताई, शुभ कल्याण यांसह इतर मल्टीस्टेट संस्थांमधील ठेवीदारांचे पैसे तात्काळ परत मिळावेत. अशी मागणी आष्टी विधानसभा मतदारसंघातील भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेच्या लिलावाच्या तारखा जाहीर कराव्यात. संचालक व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे असलेल्या मालमत्ता जप्त कराव्यात.तसेच तीसगाव डेअरी व फलटण डेअरी जप्त कराव्यात.ज्ञानराधा मल्टीस्टेटचे फॉरेन्सिक ऑडिट तात्काळ करावे.ईडीने जप्त केलेल्या मालमत्तांच्या लिलावाच्या तारखा जाहीर कराव्यात.प्रलंबित MPID प्रस्ताव तात्काळ मंजूर करावेत. या मागण्यांसाठी प्रा. सचिन उबाळे पाटील, ठेवीदार संघर्ष कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वाखाली आयोजित मुंबई येथील आझाद मैदान येथे सुरू असलेल्या ठेवीदारांच्या आंदोलनाला भेट देऊन त्यांच्या न्याय्य मागण्यांना जाहीर पाठिंबा दिला.

# परळीत २६ फेब्रुवारीला अश्वांच्या धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन; अश्वपालकांना सहभागाचे आवाहन

तभा. वृत्तसेवा

**परळी |** मयूर हॉर्स रायडिंग क्लबतर्फे प्रति वर्षाप्रमाणे यंदाही अश्वांच्या धावण्याच्या स्पर्धांचे आयोजन गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता वैद्यनाथ महाविद्यालय समोरील मैदान येथे करण्यात आले आहे. अश्वपालकांनी या स्पर्धेत सहभागी होऊन संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्लबचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश चौधरी यांनी केले आहे.

या स्पर्धांची सुरुवात १९८० पासून झाली असून या उपक्रमाला मोठी परंपरा लाभली आहे. बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी संदीप बागची यांनीही या स्पर्धेत



घोडेस्वारी करत प्रथम क्रमांक पटकावल्याची नोंद आहे. रैवाल चालीवरील घोड्यांच्या स्पर्धांची सुरुवात परळी वैजनाथ येथेच झाली. यापूर्वी अशा स्पर्धा प्रामुख्याने माळेगाव येथे गॅलपिंग प्रकारात होत असत. मात्र, त्या स्पर्धांमध्ये अपघातांचे प्रमाण अधिक असल्याने डॉ. चौधरी यांनी सुरक्षित रैवाल चालीवरील स्पर्धांची संकल्पना सुरू केली.

डॉ. चौधरी यांच्याकडे 'मयूर' नावाचा अत्यंत उत्कृष्ट घोडा होता. त्याच्या मदतीने त्यांनी अनेक उल्लेखनीय कामगिरी केल्या. त्यांच्या उक्कडगाव येथील शेताजवळ तळ ठोकून बसलेल्या, पुणे पोलिसांना हवे असलेल्या दरोडेखोरांना पकडण्यातही या घोड्याची मदत झाली होती. या घोड्याशी डॉ. चौधरी यांचे अतूट नाते होते.

परळी वैजनाथ येथे अश्वसंवर्धन आणि सुरक्षित घोडेस्वारीला चालना देण्याच्या उद्देशाने या स्पर्धा आयोजित करण्यात येत असून, परिसरातील अश्वपालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# गुतेदार आणि अभियंत्यांच्या संगनमताने हिवरापहाडी शाळेच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे



तभा. वृत्तसेवा

**बीड |** गुतेदार आणि अभियंत्यांच्या संगनमताने हिवरापहाडी शाळेच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत आहे सिईओ रहेमान शाळेला भेट देणार. बीड पृतिनिधी बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरापहाडी हि आदर्श शाळा आहे सध्या या शाळेच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू असून जुन्या विट बाधकामावरच नविन बांधकाम करून त्यालाच थातुर मातुर प्लास्टर करुन त्याला पुरेसे पाणी मारले जात नाही कामात पुरेसे सिमेंट टाकलें जात नाही मातिमिसरीत वाळु वापरली जाते गूतेदार आणि अभियंता यांच्या संगनमताने सदरील बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत आहे.

या कामाची चोकशी होनार असुन हिवरापहाडी शाळेला जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान भेट देऊन पाहणी करणार आहेत. या बदल अधिक माहिती अशी की बीड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरापहाडी हि आदर्श शाळा आहे या शाळेच्या बाजुने संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे या कामांत सिमेंट पुरेसे वापरले जात नाही जुन्या विट बाधकामावरच नविन बांधकाम करून त्यालाच थातुर मातुर प्लास्टर करुन त्यावर पुरेसे पाणी मारले जात नाही कामात मातीमिसरीत वाळु वापरली जाते आताचं भिंतीला तडे गेल्याचे दिसून येत आहे सदरील बांधकाम अंदाजपत्रका पृमाणे होत नाही गुत्तेदार आणि आभीयंता यांच्या संगनमताने सदरील बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असुन या कामांची जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान हिवरा पहाडी शाळेला भेट देऊन पाहणी करणार आहेत.

# एनएमएमएस परीक्षेत श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे यश

## (१४३ पैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण तर ९ विद्यार्थ्यांनी मिळविले १०० पेक्षा अधिक गुण)

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** एनएमएमएस परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील १४३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.

त्यापैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यात १०० च्या पेक्षा अधिक गुण ०९ विद्यार्थ्यांनी संपादन करून विद्यालयाच्या उज्वल यशस्वी परंपरा कायम राखली आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांना मेघा कुलकर्णी,लक्ष्मण काटे,अमरजा कुलकर्णी,अक्रुर यादव यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलुरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष अविनाश मुडेगांवकर,शालेय समितीचे सर्व सदस्य,मुख्याध्यापक अनंतराम कोपले,उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षिका रूपाली मुळे, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,ज्योती शिंदे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलात तीन दिवशीय गोळवलकर गुरुजी व्याख्यानमाला

**माजलगाव, प्रतिनिधी |** भाशिप्र संस्थेच्या येथील सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलात दि. २७, २८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०२६ दरम्यान याही वर्षी प.पू. गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेचे आयोजन महाविद्यालय परिसरामध्ये करण्यात आले आहे. यावर्षी व्याख्यानमालेचे २१ वे वर्षे आहे. यानिमित्त दि. २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:०० वाजता योगेश सोमन (प्रसिद्ध सिने अभिनेते) यांचे भारतीय संस्कृतीवरील आघात या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर उपस्थित असणार आहेत. दुसऱ्या दिवशी दि. २८ फेब्रुवारीला भरत अमदापुरे (प्रसिद्ध लेखक, सामाजिक कार्यकर्ते) यांचे वाटचाल विकसित भारताची या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष सत्यनारायण लोहिया हे तर तिसऱ्या दिवशी दि. ०१ मार्चला ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त भारतीय सेना अधिकारी, पुणे) यांचे ऑपरेशन सिंदूर : सामर्थ्य भारताचे या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. यावेळी संस्थेचे कार्यवाह मा. डॉ. हेमंत वैद्य उपस्थित असणार आहेत. या तीन दिवशीय व्याख्यानमालेस श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन व्याख्यानमालेचे अध्यक्ष अभय कोकड, कार्यवाह प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, सुरेंद्र रेदासणी, अँड. विश्वास जोशी, प्रशांत भानप, पवन मानधने, लक्ष्मीकांत जोशी, तेजस महाजन, मुख्याध्यापक संतोष लिंबकर, मुख्याध्यापक सुमती भारती, वर्षा कुलकर्णी, प्राचार्या वंदना मिटकरी तसेच स्थानिक पदाधिकारी यांनी केले आहे.

# हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**नवगण राजुरी |** येथे वै.ह.भ.प.रामबाबा खांबेकर यांच्या संकल्पनेतुन साकार झालेला प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळ्यानिमित्त दि.२६ फेब्रुवारी ते दि.०५ मार्च या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० गाथापारायण, १० ते १२ संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी २ ते ४ संत तुकाराम महाराज चरित्र, सायंकाळी ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन होणार असून यात ह.भ.प.नामदेव महाराज बहिर, वचिष्ठ महाराज गवते, दिपक महाराज जोशी, रामानंद महाराज पुरी, रावसाहेब महाराज शेळके, प्रा.प्रशांत पवळ, ह.भ.प.विठ्ठल महाराज बहिर यांचे प्रवचन तर ह.भ.प.गुरूवर्य महंत शिवाजी महाराज, श्रीक्षेत्र संस्थान नारायणगड, अंगद महाराज काशिद, हरी महाराज गवते, महंत रामानंद महाराज भारती, दत्ता महाराज सोळंके, अक्षय महाराज पिंगळे, श्रीरंग महाराज डोंगरे यांचे हरीकिर्तन होणार आहे. या सप्ताहाची सांगता गुरूवार दि.५ मार्च रोजी सकाळी भव्य दिव्य नगरप्रदर्षणा होईल, त्यानंतर १० ते १२ या वेळेत ह.भ.प.आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांचे संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त काल्याचे किर्तनाने होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. तरी या अखंड हरीनाम सप्ताहाचा भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन जगदगुरू संत तुकाराम महाराज बहिर मंडळ, नवगण राजुरी यांनी केले आहे.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात नेत्र तपासणी शिबिर

**बीड |** बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सूर्या नेत्रालय येथील नेत्रतज्ज्ञ डॉ. अंजली गायकवाड यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिराचे उद्घाटन डॉ. गणेश ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिबिरामध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली. गरजू रुग्णांना अल्प दरात चष्म्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच डोळ्यांच्या विविध समस्यांचे निदान करून रुग्णांना योग्य उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली चिटकुलवार, डॉ. ऋषिकेश आंधळे, डॉ. प्रमोद गोरे (सीएचओ, बोरखेड), विशेष सहकार्य केले. या नेत्र तपासणी शिबिरामुळे ग्रामस्थांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# जिल्ह्यात पोलीस पाटील भरतीची लेखी परीक्षा शांततेत; २ मार्चला अंतिम निकाल

**बीड |** बीड जिल्ह्यातील पोलीस पाटील भरतीसाठीची लेखी परीक्षा अत्यंत पारदर्शक पद्धतीने आणि शांततेत पार पडली. या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या ११,३२५ उमेदवारांपैकी १०,८८६ उमेदवार हजर होते, तर ४३९ जणांनी दांडी मारली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः विविध परीक्षा केंद्रांवर जाऊन पाहणी केली. संपूर्ण प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेरे आणि भरारी पथकांची करडी नजर होती.

प्रशासनाकडून मिळालेल्या वेळापत्रकानुसार, लेखी परीक्षेचा निकाल २४ फेब्रुवारीला जाहीर होईल आणि २५ फेब्रुवारीला मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाईल. पात्र उमेदवारांच्या मुलाखती २६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान घेतल्या जाणार असून, २ मार्च २०२६ रोजी या भरती प्रक्रियेचा अंतिम निकाल घोषित केला जाईल.

# अवकाळीने रब्बी पिकांचे मोठे नुकसान, पंचनामे करून मदत देण्यात यावी - किसान सभा







तभा. वृत्तसेवा

**परळी |** परळी तालुक्यातील मोहा, सिरसाळा, गाढे पिंपळगावसह सर्वच महसूल मंडळात सोमवार दि २३ रोजी सोसाट्याचा वाऱ्यासहअवकाळी पाऊसने रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले असून पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून मदत देण्यात यावी अशी मागणी किसान सभेने परळी महसूल कार्यालयात निवेदनाद्वारे केली.

परळी तालुक्यातील सर्वच महसुली मंडळात सोमवार दि २३ रोजी वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस झाला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, काढणीला आलेली उभी पिके भूईसपाट झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, हरभरा आणि गहू या पिकांचा समावेश आहे. हाता तोंडाशी आलेला घास या पावसामुळे हिरावला गेल्याने शेतकरी पूर्णपणे हतबल झाल्याने किसान सभेने प्रशासनाला निवेदन करत महसूल व कृषी विभागाने तातडीने परळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकाच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, खरीप २०२५ चा पीक विमा तातडीने द्यावा. खरीप २०२६ मधील अतिवृष्टी व अवकाळी पावसाचे अनुदान लवकरात लवकर वितरित करावी या मागण्या केल्या आहेत. या प्रसंगी किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ.मुरलीधर नागरगोजे, रमण सोळंके, माणिक सोळंके, नागनाथ सातभाई, प्रकाश चव्हाण आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्बकूल मध्ये बक्षीस वितरण समारंभ

तभा. वृत्तसेवा

**केज |** केज तालुक्यातील युसुफवडगाव/रामवडगाव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल मध्ये दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ वार -मंगळवार रोजी शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ संपन्न झाला.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्री. अविनाश थळकरी प्राचार्य वसंत डी. फार्मसी कॉलेज

तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री.चंद्रकांत आण्णा भुसारी (ग्रामपंचायत सदस्य) श्री. गोविंद शिनगारे (पत्रकार), श्री. शिवदास खरबड सर,व पत्रकार श्री.सचिन उजगरे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते *छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीला पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.तसेच उपस्थित मान्यवरांचा इरा इंग्लिश स्कूलचे संचालक श्री.बापुसाहेब भुसारी सर व श्री.लक्ष्मण दोडके ,पंकज माने यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात वक्तृत्व स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे व द्वितीय क्रमांकाचे विजेते विद्यार्थी यांच्या तडफदार भाषणाने झाली. यानंतर वक्तृत्व स्पर्धेचे विजेते यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसाचे मानधन व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

प्रथम क्रमांकाचे बक्षिस स्पर्श डेव्हलपर्सचे श्री.प्रभु पाटिल द्वितीय क्रमांक बक्षिस ॲड.हनुमंत जाधव तृतीय क्रमांक बक्षिस श्री.गणेश रोडगे व उत्तेजनार्थ बक्षिस इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल तर्फे देण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी भाषणे खुप छान केली.त्यातील काही विद्यार्थ्यांनी बक्षिस पटकावता आले नाही परंतु त्या तोडीस तोड भाषणे सादर केली त्यामुळे त्यांना देखील प्रोत्साहन पर प्रमाणपत्र



व ट्रॉफी देण्यात आली.

वक्तृत्व स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे

ग्रुप -१

ओवी विशाल खोडसे, वेदिका अनिल मुळे, सारांश श्रीरंग तानगे उत्तेजनार्थ सायली अक्षय रोडगे, हर्ष आकाश शिंदे

प्रोत्साहन पर शिवतेज ऋषिकांत चौधरी,

ग्रुप-२

आयुष अविनाश थळकरी, विराज विनोद चौधरी, आरोही धनंजय बावकर,

उत्तेजनार्थ

दिव्यांश सुरज मानधने, आरोही सचिन मस्के.

प्रोत्साहन पर

शांभवी प्रविण राजमाने, वेद सुशीलकुमार झाडबुके, श्रेया अजित चौधरी,

ग्रुप -३

तन्वी अनंत थळकरी, नारायणी नारायण मस्के, अपेक्षा राहूल सावंत,

उत्तेजनार्थ

स्वरा संतोष सोमवंशी, अंकिता जितेंद्र मस्के,

प्रोत्साहन पर माधवी बापुराव मुळूक, शांभवी शिवदास थळकरी, शिवम अशोक सावंत.

ग्रुप -४

प्रियल उमाशंकर तोडकर, सार्थक उमेश पवार, वरद मन्मथ गुजर.

उत्तेजनार्थ

श्रिशा श्रीरंग तानगे, समिक्षा गणेश गुंड,

प्रोत्साहन पर

समर्थ विलास पानढवळे, अथर्व महादेव सरकटे, स्वराज विकास दौंड.

उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देखिल केले व शाळा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करत असलेल्या प्रयत्नांची दखल देखील त्यांनी घेतली. तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडणे हि काळाची गरज आहे असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संचालक श्री बापुसाहेब भुसारी सर, सर्व इरा स्टाफ व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते

अशाप्रकारे शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेचे बक्षिस वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शरद पवार गटाचे अतिष दांडेगावकर यांचा आज भाजपमध्ये प्रवेश

## कार्यकर्त्यांचा आग्रह व विकासाच्या मुद्द्यांवर करणार प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी तथा माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे सुपूत्र अतिष दांडेगावकर गुरूवार दि २६ फेब्रुवारी रोजी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करणार आहेत. कार्यकर्त्यांचा आग्रह आणि विकासाच्या मुद्द्यावर तसेच सर्वांना सोबत घेण्याच्या भूमिकेतून आपण भाजपमध्ये प्रवेश करीत असल्याचे दांडेगावकर यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे सुपूत्र अतिष दांडेगावकर यांनी मागील काही दिवसांपासून पक्षाची कमान सांभाळली होती. अतिष दांडेगावकर राजकीय क्षेत्रात सक्रीय झाल्यामुळे वसमत विधानसभा मतदार संघासह जिल्ह्याच्या राजकारणावर त्याचा परिणाम दिसू लागला होता. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची तयारीही त्यांनी चालवली होती.

मात्र राष्ट्रवादी ऐवजी भाजपमध्ये प्रवेश करून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करावेत असा सूर त्यांच्या कार्यकर्त्यामधून व्यक्त केला जाऊ लागला होता. त्यामुळे अतिष दांडेगावकर यांनीही कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी वसमत विधानसभा मतदार संघात पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका घेवून त्यांची भूमिका जाणून घेतली होती. त्यानुसार त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करावा असा एकमुखी निर्णय कार्यकर्त्यांनी दिला होता. त्यानुसार अतिष दांडेगावकर यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी वसमतसह जिल्हाभरातून सुमारे चार हजार पेक्षा अधिक कार्यकर्ते मुंबईकडे रवाना झाले आहेत. दि २६ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे एका विशेष कार्यक्रमात ते भाजपमध्ये प्रवेश घेणार असल्याचे कळते. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे हिंगोली जिल्ह्यात भाजपाला आणखी बळ मिळणार आहे.

अतिष दांडेगावकर हे स्वच्छ प्रतिमेचे आणि युवा नेतृत्व असून वसमतसह औंढा नागनाथ तालुक्यात भाजपला मोठी ताकद मिळणार आहे. वसमत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी एकत्र असतांना माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांनी त्याग करीत राजू नवघरे यांना विधानसभा निवडणुकीत पाठींबा देत विजयी केले होते. परंतु त्यानंतर राष्ट्रवादीमध्ये दोन गट पडले. त्यानंतर आ. राजू नवघरे यांनी अजित पवार गटासोबत जाणे पसंद केले.

मागील नगर परिषदेच्या निवडणुकांमध्ये वसमतमध्ये भाजपला दारूण पराभवाला सामोरे जावे लागले होते परंतु आता अतिष दांडेगावकर यांचेसारखे नेतृत्व भाजपला मिळाल्यामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये चुरस निर्माण होणार असल्याचे दिसत आहे.

# पोलिस अधीक्षकांकडून भरोसा सेलच्या कार्याचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**

हिंगोली पोलिस दलाच्या भरोसा सेल विभागाच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी भरोसा सेलच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रेमलता जगताप यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला आहे.

सन २०२५ या वर्षात कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये प्रभावी समुपदेशन करून तब्बल २७८ विवाहीत जोडप्यांचे संसार पुन्हा जूळवण्यामध्ये त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या समुदपदेशानमुळे अनेक कुटुंबे पुन्हा एकत्र येऊन नव्याने संसार सुरू करण्यास सक्षम झाली. त्यामुळे भरोसा सेलवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. पोलिस अधीक्षक रोहन यांनी भरोसा सेल येथे कार्यरत पोलिस उपनिरीक्षक शेख, महिला पोलिस अंमलदार पेंदोर, अनिता जाधव, सीमा पाटील, वर्षा शिंदे, रविना घुमनर यांची उत्कृष्ट कामगिरी बाबत प्रशंसा केली.

याशिवाय अप्पर पोलिस महासंचालक महिला व बाल अपराध प्रतिबंध, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या आदेशानुसार हरवलेली मुले व बालके शोधण्यासाठी २०/०१/२६ ते २०/०१/२६ पावेतो ऑपरेशन मुस्कान ही विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहीमे दरम्यान हिंगोली जिल्ह्यातील ६ अल्पवयीन अपहरण झालेले सन २०२२ पासून बेपत्ता असलेल्या बालकांना मोहीमे दरम्यान शोधून काढले. तसेच अनैतिक मानवी वाहतूक शाखा, सायबर सेल आणि पोलिस ठाणे हिंगोली ग्रामीण, बासंबा, हट्टा, आखाडा बाळापूर येथील अधिकारी व अंमलदार यांनी यामध्ये मोलाचा सहभाग दिला.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रेमलत जगताप यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत केले आहे. त्यांच्यासोबतच महिला पोलिस अंमलदार नंदा धोंगडे, आरती साळवे, चालक पोलिस हवालदार सरनाईक यांनी सुध्दा सदर मोहीमे दरम्यान तपासात मदत केली आहे.

ऑपरेशन मुस्कान या विशेष मोहीमे दरम्यान केलेल्या कामगिरीमुळे पोलिस प्रशासनाबरोबरच समाजातही समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून महिलांच्या सुरक्षेसाठी व कुटुंबसंस्थेच्या जतनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखीत होत आहे.

# चित्र रथाद्वारे शासनाच्या योजनांची अनेक गावांमध्ये जनजागृती




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२०२६ अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून विविध विभागाच्या कल्याणकारी विविध योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

हिंगोली जिल्ह्यातील वडद, लाख, पिंपळदरी, जलालदाभा, लोहारा बु. आदी गावामध्ये चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून विविध विभागाच्या कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यात आली . या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**हिंगोली- औंढा नागनाथ पंचायत समितीमध्ये बीएलओची बैठक तहसीलदार हरिष गाडे यांनी घेतली. या बैठकीत एसआयआर बाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी वसमत आणि कळमनुरी विधानसभा अंतर्गत येणारे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती. छाया- दत्तात्रय शेगुकर**

## संक्षिप्त वृत्त

### एबीएमच्या विद्यार्थ्यांची अंध विद्यालयाला भेट



हिंगोली- येथील ए.बी.एम. इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मातोश्री गंगादेवी देवडा निवासी अंध मुलांचे विद्यालय येथे प्रेरणादायी भेट दिली. या भेटीदरम्यान ए.बी.एम. इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अंध विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करून सामाजिक बांधिलकीची जाणीव व्यक्त केली. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर, संचालक अजिंक्य बांगर, मुख्याध्यापक रॉबिन तसेच उपमुख्याध्यापक सचिन यांनी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना समाजसेवेचे महत्त्व पटले. या भेटीत अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. तसेच त्यांच्या दैनंदिन दिनचर्येबाबत व शिक्षणपद्धतीबाबत माहिती देण्यात आली. अंध विद्यालयाच्या वतीने मोहनिष चव्हाण, सुमित दुबे, शिकेश यरमळ, तुकाराम जाधव, बसवेश्वर जाधव आणि ऋषीकेश पांचाळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सय्यद अनिस, अविनाश गायकवाड, स्मिता नाईक यांच्या सह विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली असून समाजसेवेची भावना अधिक दृढ झाली.

### १४ मार्चला राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

हिंगोली- येथील जिल्हा व सत्र न्यायालयात व त्या अंतर्गत येणाऱ्या विविध न्यायालयात तालुका विधी सेवा समिती व वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा न्यायालय परिसरात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीमध्ये भूसंपादन व मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, तडजोडयुक्त फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, वैवाहिक/ कौटुंबिक वाद प्रकरणे, पराक्रम्य अभिलेख अधिनियमचे कलम १३८ खालील प्रकरणे, नगर परिषद, विद्युत महावितरण कंपनी, बँक व पतसंस्थांचे वाद पूर्व प्रकरणे इत्यादी खटले तडजोडीसाठी ठेवण्यात आली आहेत. ही सर्व प्रकरणे आपआपसातील तडजोडीद्वारे निकाली काढता यावीत. यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीचा जास्तीत जास्त पक्षकार मंडळींनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश टी. एस. अकाली, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. श्रीधर घुगे यांनी केले आहे.

### ५१ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५१ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाने कार्यवाही करीत वाहन चालकांकडून ४७ हजार ८०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. दारूबंदी कायद्यांतर्गत पोलिसांनी जिल्ह्यात ७ ठिकाणी छापे मारून आरोपीतांकडून ६७३० रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत गुन्हे दाखल केले आहेत तर ३ ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापे मारून मुद्देमाल जप्त करीत गुन्हे दाखल केले आहेत.

# जिल्हा व सत्र न्यायालयाचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**

न्यायिक जिल्हा परभणी येथून हिंगोली येथे स्वतंत्र जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आली होती. त्यानुसार न्यायिक जिल्हा हिंगोली अस्तित्वात आला. याच्या वर्षपूर्तीनिमित्त दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली येथे प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा वकील संघाचे अध्यक्षर ॲड. श्रीधर घुगे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. एस. अकाली उपस्थित होते.

येथील जिल्हा वकील संघाच्या वतीने आयोजित हा वर्धापन दिन कार्यक्रम जिल्हा न्यायालय परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ श्रीमती एस. एन. माने-गाडेकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ आर. एम. रोटे, दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) व्ही. एम. मानखैर, मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती ए. बी. कुरणे, सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) श्रीमती व्ही. व्ही. सावरकर, द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) पी. जी. महाळकर, द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) डी. व्ही. भंडारी, तृतीय सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) श्रीमती एस. एस. पळसुले यांच्यासह जिल्ह्यातील ज्येष्ठ विधीज्ञ, वकील व पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. मिलिंद कांबळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष ॲड. डी. बी. खंदारे यांनी केले.

# वसमत विधान सभेचे आ. राजु नवघरे यांनी भूषविले तालिकाध्यक्ष पद



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २५ फेब्रुवारी**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आमदार राजूभैया नवघरे यांनी तालिका सभापती म्हणून सभागृहाचे कामकाज अत्यंत संयम, शिस्त आणि प्रभावी नेतृत्वगुणांच्या बळावर यशस्वीपणे पार पाडले.

अर्थसंकल्पीय अधिवेशन हे राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. अशा वेळी सभागृहाचे संचालन करण्याची जबाबदारी मिळणे ही मोठी सन्मानाची बाब असते. राजूभैय्यांनी नियमांचे काटेकोर पालन करत, सदस्यांना आपले मुद्दे मांडण्यासाठी समान संधी देत आणि चर्चेला योग्य दिशा देत संसदीय परंपरांचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. त्यांच्या शांत, समतोल आणि ठाम भूमिकेमुळे सभागृहाचे कामकाज सुरळीत पार पडले. लोकप्रतिनिधी म्हणून वसमत मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे, विविध प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारे आणि जनतेच्या हितासाठी लढणारे राजूभैया नवघरे संपूर्ण राज्याच्या सभागृहात अध्यक्षस्थानावर विराजमान झाले, हा क्षण प्रत्येक वसमतकरासाठी अभिमानाचा ठरला आहे. हा केवळ वैयक्तिक सन्मान नसून संपूर्ण वसमत विधानसभेच्या जनतेच्या विश्वासाचा आणि योगदानाचा गौरव आहे. वसमतच्या राजकीय वाटचालीतील हा एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. कार्यकर्ते व नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शिरड शहापूर येथे पशु प्रदर्शन मेळावा



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २५ फेब्रुवारी**

तालुक्यातील शिरडशहापूर येथे दिनांक २४ फेब्रुवारी रोजी हजरत जिंदाशाह मदार मैदानावर पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद व पंचायत समिती औंढा नागनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने पशुप्रदर्शन मेळावा घेण्यात आला. यामध्ये २०७ गाई बैल जोड्यांनी सहभाग नोंदविला.

या पशु मेळाव्याचे उद्घाटन माजी जि.प. उपाध्यक्ष मिलिंद यंबल यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून येथील सरपंच यशवंत रावले यांची उपस्थिती होती. या पशुप्रदर्शनामध्ये पशुपालकांनी हजेरी लावत आपल्या बैल जोड्या गाई प्रदर्शनात आणल्या होत्या यामध्ये देशी संकरित गाय बैल यांचा समावेश होता. पशुधन विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवड समितीने गुरांची पाहणी करून गाय व बैल जोड्यांचे एकूण सात गटांमध्ये प्रथम द्वितीय व तृतीय असे क्रमांक काढले. त्या पशुपालकांना रोख बक्षीस देण्यात आले. प्रोत्साहनपर बक्षीस सुद्धा देण्यात आले. या ठिकाणी गुरांना घेऊन येणाऱ्या शेतकरी पशुपालकांना सहभाग भत्ता देण्यात आला.

यावेळी जि. प.पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. आर.ए. काल्यापुरे, तालुका पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. शिवाजी बुचाले, तसेच पशुधन विकास अधिकारी डॉ.सिद्धार्थ इंगोले, डॉ. गोविंद देवदे, डॉ. आकाश राठोड, डॉ.व्यंकटेश देवकते, डॉ. दिनेश रामपुरे, डॉ.आदित्य पारवेकर हे उपस्थित होते या पशु मेळाव्यासाठी गणेश सूर्यवंशी, जयश्री शेळके, वैभव खनपटे, इमदादखा पठाण, घनश्याम मेहेत्रे, साजिद पठाण, महेंद्र झडते, चंद्रमणी पाईकराव, मोहन राठोड आदींनी परिश्रम घेतले.

# गोडाती काळे यांच्या मशानातील जीन कथेला राज्यस्तरीय पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य, साहित्य भारती महाराष्ट्र प्रदेश देवगिरी प्रांत व श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या साहित्योत्सव २०२६ राज्यस्तरीय साहित्य संमेलनात हिंगोली येथील कवी तथा कथाकार गोडाती काळे यांच्या 'मशानातील जीनं' या कथेला राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

या कथा स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या विविध कानाकोपऱ्यातून नामवंत व दिग्गज कथाकारांनी सहभाग नोंदविला होता. तीव्र स्पर्धा आणि उच्च साहित्यिक दर्जाच्या कथांमधून 'मशानातील जीनं' या कथेला निवड समितीने विशेष दाद देत राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली. या पुरस्कारामुळे हिंगोली जिल्ह्याच्या साहित्य परंपरेला नवे बळ मिळाले असून, ग्रामीण व उपेक्षित घटकांच्या प्रश्नांवर लेखन करणाऱ्या साहित्यिकांना प्रेरणा मिळाली आहे. साहित्य क्षेत्रातील हा मानाचा तुरा गोडाती काळे यांच्या साहित्य प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

मसाप शाखा हिंगोलीचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर, नामदेवराव वाबळे, दिलीप धामणे तसेच थवा प्रकाशनचे संचालक गणेश येवले, रतन आडे, सौ सुमन दुबे, डॉ.राधिका देशमुख, पारिजात देशमुख ईत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले..

# ज्या अधिकाऱ्याविरोधात तक्रार, लाच लुचपतने त्यालाच केले बाजुला; तक्रारदाराचे न्यायालयात शपथपत्र दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ फेब्रूवारी-**

ज्या अधिकाऱ्याविरुद्ध लाच मागणीची माझी मूळ तक्रार होती, त्या अधिकाऱ्यावर जाणीवपूर्वक कारवाई न करता त्यांना मदत करणाऱ्या सहकार्यालाच केवळ आरोपी केल्याचा आरोप एका तक्रारदाराने नांदेड येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागातील काही वरिष्ठांवर केला आहे. तक्रारीतील मुख्य आरोपीला सोयीस्करपणे बाजूला करण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने पुन्हा एकदा लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधीक्षकांना एक तक्रार दिली. पण त्यानेही काहीच परिणाम झाला नाही. मग शेवटी तक्रारदाराने थेट न्यायालयात शपथपत्र दाखल करत या गोष्टीला वाचा फोडल्याची घटना घडली आहे.

ज्ञानोबा दत्तात्रय नलबलवार हे गृहस्थ लोहा तालुक्यातील भाद्रा येथील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून सेवारत आहेत. नलबलवार यांनी अर्जित असलेल्या आपल्या रजे पैकी ४६ दिवसांची रजा मान्य करावी अशी विनंती गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती लोहा यांना लेखी स्वरूपात केली. त्यानुसार या प्रकाराची गट शिक्षण विभागाची कामे पाहण्याची जबाबदारी संबंधित केंद्रप्रमुख असलेल्या रिसनगाव शाळेतील दिगंबर शिंदे यांच्याकडे होती. याच शिंदेंनी गटशिक्षणाधिकारी सुनील व्यवहारे यांच्यासाठी नलबलवार यांच्याकडे लाचेची मागणी केली. या प्रकरणापूर्वीही सुनील व्यवहारे व दिगंबर शिंदे यांनी नलबलवार यांची वेतन वाढ रोखून धरत १३ डिसेंबर २०२५ रोजी नलबलवार यांच्याकडून चार हजार रुपये कार्यालयात स्वीकारले होते. त्यावेळी सुनील व्यवहारे यांच्याकडून होणाऱ्या मानसिक, आर्थिक व शारीरिक त्रासाला वैतागलेल्या नलबलवार यांनी लाचलुचपत विभागात तक्रार देण्याचा प्रयत्न केला. पण त्यावेळी या कार्यालयातील डीवायएसपी प्रशांत पवार यांनी त्यांची तक्रार न घेता त्यांनाच उलट धमकावून तीन ते चार वेळेस हाकलून दिले होते. म्हणून यावेळी नलबलवार यांनी या विभागाचे सर्वात वरिष्ठ अधिकारी संदीप पालवे यांना भेटून आपली तक्रार सांगितल्यानंतर त्यांनी पोलीस निरीक्षक अनिता चव्हाण आणि डीवायएसपी राहुल तरकसे यांना याविषयी पुढील कारवाईस्तव सुचित केले. विशेष म्हणजे यावेळी डीवायएसपी प्रशांत पवार हे रजेवर होते. म्हणून यावेळी नलबलवार यांची तक्रार घेतली गेली असे नलबलवार यांचे म्हणणे आहे.पण यानंतर पुन्हा रुजू झालेल्या डीवायएसपी प्रशांत पवार यांनी हे प्रकरण आपल्याकडे घेत पुढची सूत्र हलवली. इतर प्रकरणात लाच मागणीची आवश्यकतेनुसार दहा-पंधरा किंवा अनेक वेळी पडताळणी करणाऱ्या या विभागाने नलबलवार यांच्या प्रकरणात केवळ एकदाच पडताळणी शिवाय सापळा कारवाई यशस्वी झाल्यानंतर त्या कार्यालयाला सील का केले गेले नाही? हाही महत्त्वाचा प्रश्न असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणातील तत्कालीन तपासी अधिकारी यांनी शिंदें यांना तीन दिवसाची पीसीआर मिळवण्यात यश मिळवले खरे, पण शिंदे यांना तीन दिवसाचा पीसीआर दिल्याचे कळताच लगेचच या तपासी अधिकाऱ्याकडून हा तपास काढून घेऊन दुसरीकडे देण्यात आला, ते का? विशेष म्हणजे हा तपास ज्या दुसऱ्या महिला अधिकाऱ्याकडे देण्यात आला, त्यांनी पीसीआर चे गांभीर्य व आपले कर्तव्य विसरून पीसीआरच्या दिवसात डीवायएसपी प्रशांत पवार यांच्यासह माहूर येथे दर्शनासाठी वारी का केली असे अनेक संशयास्पद मुद्दे नलबलवार यांनी आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ या शपथपत्रात उल्लेखीलेले आहेत.

उल्लेखनीय बाब अशी की, साधारण सहा महिन्यांपूर्वी नांदेड जिल्हा परिषदेतील एका अधिकाऱ्याच्या गाजलेल्या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील काही जणांकडून माहिती 'लीक' झाल्याचा प्रकार घडून शेवटी यातील तक्रारदार महिलेला (ना)राजीने तक्रार मागे घ्यावी लागल्याचे वृत्त वर्तमानपत्रात त्यावेळी ठळकपणे प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे या दोन्ही प्रकरणाची सांगड घालत, वास्तविकता शोधण्याचा प्रकार काही जाणकार करत आहेत. तर अलीकडच्या काही काळात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केलेल्या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांना मायेपोटी अलगद बाजूला काढत, कनिष्ठांवर आरोप लादल्याची उदाहरणे कुंडलवाडी, हदगाव, मरखेल, सोनखेड, उस्मान नगर, हदगाव, रामतीर्थ आदी ठिकाणी हेतू पुरस्कार घडविल्याची चर्चाही जाणकार करत आहेत.

# डॉ. निधी पांडे व जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले यांची जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपूरी शाळेला भेट

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २५ फेब्रूवारी-**

लातूर विभागात पिएमश्री योजने अंतर्गत प्रथम आलेल्या विष्णुपुरी जिल्हा परिषद शाळेस भारत सरकारचे सहसचिव डॉ.निधी पांडे व नांदेड जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले यांनी २४ फेब्रुवारी रोजी भेट देऊन पाहणी करून विध्यार्थी पालकांशी ,सुसंवाद साधला,व भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता बाबींचे निरीक्षण केले.




विष्णुपुरी येथील जिल्हा परिषद शाळा पीएम पीएमश्री योजना ही एक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण छएझ-२०२० च्या अंतर्गत सरकारी शाळांच्या दर्जा उंचवणारी केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत देशभरात १५,५०० हून अधिक सरकारी शाळांना पीएमश्री शाळेच्या दर्जा प्राप्त झालेला आहे. या शाळा मॉडल शाळा म्हणून विकसित केल्या जात असून, डिजिटल शिक्षण,आधुनिक पायाभूत सुविधा, आणि सर्वांगीण विकासावर भर देऊन गुणवत्तेचे नेतृत्व करतात. महाराष्ट्रात ही या योजनेअंतर्गत अनेक शाळांची निवड करण्यात आली असून, त्यांच्या कायापालट केला जात आहे.त्यातील नांदेड जिल्ह्यातील एक नामांकित शाळा म्हणून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा योजने अंतर्गत लातूर विभागात प्रथम आलेली शाळा म्हणजे पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी होय,ही शाळा पीएम श्री योजने अंतर्गत असल्या कारणाने तसेच लातूर विभागात प्रथम आलेली शाळा असल्या मुळे भारत सरकारच्या सह सचिव डॉ.निधी पांडे यांच्या मार्गदर्शनात नांदेड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी डॉ .राहुल कर्डिले मुक्कावार ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड, शिक्षण अधिकारी सौ.वंदना फुटाणे सलगर ,बनसोडे,शिक्षण विभागातील अन्य अधिकाऱ्यांनी पीएम जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी या शाळेला २४ फेब्रुवारी रोजी भेट देऊन शाळेतील विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला, भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता इत्यादी बाबींचे निरीक्षण करून पीएमश्री योजने पूर्वीची आणि पीएमश्री योजनेनंतर शाळेची स्थिती जाणून घेतली.या योजनेच्या माध्यमातून शाळेच्या प्रगतीचा अहवाल पीपीटी च्या माध्यमातून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला जाधव आणि शिवाजी वेदपाठक यांनी सर्व मान्यवरांनी दाखवले. मान्यवरांनी विद्यार्थी,पालक,शालेय व्यवस्थापन समितीचे सन्माननीय सर्व सदस्य, यांच्याशी यांच्याशी शैक्षणिक चर्चा करून शाळेतील वर्ग,भौतिक सुविधा,शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत आहार, इत्यादी बाबींचे निरीक्षण करून शाळेतील सर्व शिक्षकांचे कौतुक करून मार्गदर्शन केले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास आबासाहेब देशमुख हंबर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, माणिकराव हंबर्डे, शिवाजीराव हंबर्डे, विश्वनाथराव हंबर्डे,विष्णुपुरी ग्रामपंचायतच्या सरपंच संध्याताई विलासराव हंबर्डे,उपसरपंच अर्चना विश्वनाथराव हंबर्डे,राजेश हंबर्डे, पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे,अमृत हंबर्डे, व इतर गावातील प्रतिष्ठित नागरिक पालक उपस्थित होते.

## अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा : खा.आष्टीकर


**हदगाव** -मागच्या काही दिवसांपूर्वी अचानक पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होऊन त्यांच्या पिकांची अतोनात नुकसान झाले असून याची गंभीर दखल घेत



हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी हिंगोली, यवतमाळ सह नांदेड जिल्ह्यात तात्काळ पाहणी करून पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी तिन्ही जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. नांदेड, यवतमाळसह हिंगोली जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या गहू, भाजीपाला, टरबूज सारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असून तिन्ही जिल्ह्यातील त्रस्त शेतकरी विविध सामाजिक संघटना व आमच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख यांनी प्राथमिक स्तरावर तालुका स्तरावरील मदत करण्याची मागणी करण्यात आली आहे. उमरखेड, महागाव, वसमत, कौठा यासह नांदेड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील पाहणी तात्काळ करून पंचनामे सादर करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी तिन्ही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

## डॉ. स्वप्नील खंडेराव यांचा एमडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश

**नांदेड**-चुडावा येथील शेतकरी कुटुंबातील डॉ .स्वप्निल खंडेराव देसाई



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबई येथे एम.डी.(M.D. naesthesia) प्रवेश मिळाला आहे. त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र कावलगाव येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले . या यशाबद्दल दादाराव घायाळ, अडकिने चांदोजी ,बालाजी देसाई, अविनाश देसाई, सचिन देसाई, चंद्रकांत देसाई, बालाजी देसाई, अशोक देसाई, मारोती देसाई, प्रताप देसाई आदी सह गावातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

## महामूर्ख कवी संमेलनात यावर्षी पहिल्यांदाच द्विअर्थी कव्वालीचा कार्यक्रम

**नांदेड**-होळी निमित्त होणाऱ्या २६ व्या महामूर्ख कवी संमेलनात यावर्षी पहिल्यांदाच द्विअर्थी कव्वालीचा कार्यक्रम ठेवण्यात आला असून सोमवार दि.२ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता नवा मोंढा मैदान नांदेड येथे १६ वर्षावरील तरुणांनी व पुरुषांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक अॅड. दिलीप ठाकूर, सुरेश लोट, डॉ. जुगल धूत व पंढरीनाथ बोकारे यांनी केले आहे. यावर्षी कवी संमेलनाला मार्केट कमिटी सभापती संजय लहानकर हे उद्घाटक तर विशेष अतिथी म्हणून उपमहापौर दीपकसिंह रावत, प्रमुख अतिथी म्हणून शिवप्रसाद राठी, सतीश शर्मा, योगेश जायस्वाल, नवल पोकर्णा,सरदार रविंद्रसिंघ बुंगई, नागेश शेट्टी, शिवाजी ईबितवार, अंबादास लालपोतू, छोटा बंडू पावडे, चिंटू हरकारे,बंटी अग्रवाल, व्यंकट मोकले यांच्यासह इतर उपस्थित राहणार आहेत. व अध्यक्षांची शोध मोहीम चालू आहे. या कवी संमेलनात महाराष्ट्राचे सिने गीतकार व गायक एकनाथ माळी आणि पार्टी पनवेल विरुद्ध महाराष्ट्राची डेंजर फटाकडी गायिका ज्योती शिंदे आणि पार्टी नवी मुंबई यांच्या डबल मिनिंग कव्वालीचा जंगी सामना पहिल्यांदाच होळीच्या चाहत्यांना मिळणार आहे. कवी संमेलन यशस्वी करण्यासाठी कामाजी सरोदे, राजेशसिंह ठाकुर, सुरेश शर्मा, अरुण काबरा, संतोष भारती, शिवा लोट, सुरेश निल्लावार हे परिश्रम घेत आहेत.

# बाऱ्हाळीत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्य यांच्या पादुका दर्शन सोहळा

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २५ फेब्रूवारी-**

बाऱ्हाळी येथे जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नानिजच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांच्या पादुका भव्य मिरवणूक, पादुका दर्शन सोहळा , उपासक दिक्षा ,पुष्पवृष्टी ,गुरूपूजन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



बाऱ्हाळी ता. मुखेड येथे मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिध्द पादुकांची मुख्य रस्त्यावरून विविध देखावे, टाळ मृदंगाच्या घोषात भव्य मिरवणूक काढण्यात आली. भक्तांना भव्य मिरवणूक आणि गुरुपूजन पालखी सोहळा, अध्यात्म, भक्ती आणि परंपरेचा सुंदर संगम अनुभवयास मिळाला. यावेळी दुर्बल घटक उपक्रमाअंतर्गत गरीब व गरजू कुटुंबाना घरघंटी पिठाची गिरणीचे वाटप प्रमुख अतिथी गंगाधर राठोड, (नगरसेवक तथा मा.नगराध्यक्ष मूखेड ),राजन देशपांडे (सरपंच प्र.), काकासाहेब वनारसे (पिठ प्रमूख ,उपपिठ तेलंगणा), शेषराव चव्हाण (नेते राष्ट्रवादी काँग्रेस), डॉ. श्रावण रँपनवाड (प्रदेश सचिव काँग्रेस ), मल्हारराव देशपांडे, विजयाताई देशपांडे,खूशालराव पा.उमरदरीकर ,शेखर देशमुख, बालाजी पा.सकनूरकर, साहेबराव देशमुख ,यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मोफत वाटप करण्यात आले. नाणीजधाम येथील ज.न.म.प्रवचनकार विपिन नेवासकर यांचे सूंदर अम्रतमय प्रवचन झाले तर भक्तांनी जय सियाराम, जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी की जय च्या जयघोषांनी अख्खा परिसर दुमदुमून टाकला.

सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळल्याचे चित्र यावेळी दिसून आले. पादुका दर्शन सोहळ्यास उदगीर, जळकोट, मुखेड, देगलूर, बिलोली आधी परिसरातील जवळपास तीस हजार भाविक उपस्थित होते. पारंपरिक ढोल-ताशे, टाळ-मृदंग, भजन-कीर्तन, व लझीम च्या तालात पादुकांची(रथ) मिरवणूक काढण्यात आले.

या सोहळ्यात महिला, बालके, युवक, ग्रामस्थ आणि विविध सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनातर्फे तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता. हा सोहळा पूर्णत्वास नेण्याकरिता म्हणून आयोजक समितीने अथक परिश्रम घेत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात उत्कृष्ट नियोजन करून हा सोहळा यशस्वीरित्या संपन्न केला. श्रद्धा, संस्कृती आणि अध्यात्मिक वारसाचे जतन करणारा सोहळा ठरल्याची भावना उपस्थितांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा सेवा समिती नांदेड (दक्षिण ),तालुका सेवा समिती, उत्सव समिती व कार्य समिती बाऱ्हाळी यांनी परिश्रम घेतले.

## नागापूर येथे आज बौध्द धम्म परिषदेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २५ फेब्रूवारी-**

दरवर्षी प्रमाणे आदर्शगाव नागापूर येथे गुरूवार दि. २६फेब्रुवारी २६रोजी १४ वी बौध्द धम्म परिषदचे आयोजन करण्यात आले असून या परिषदेत राष्ट्रीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे प्रबोधनपर व्याख्यान व गायन होणार आहे.

गुरुवार दि.२६ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वाजता बौद्ध महासभेचे ता. अध्यक्ष सुरेश जोंधळे यांचे हस्ते ध्वजारोहण होणार असून गंगाधर शानमवाड , बालाजी शानमवाड , रुक्माजी बेरदेवाड यांची उपस्थिती रहाणार आहे. दुपारी १२ वाजता भदंत पय्याबोधी थेरो यांच्या हस्ते धम्म परिषदेचे उद्घाटन व प्रवचन होणार आहे.दुपारी ३ वाजता यश मार्केटींग नांदेड यांच्या वतीने भोजन दान करण्यात येणार आहे . त्यानंतर प्रसिद्ध गायिका प्रबोधनकार निशा धोंडगे यांच्या बुध्द भीम गिताचा बहारदार कार्यक्रम होणार आहे.

# ठाण मांडून बसलेल्या ग्रामसेवकाच्या बदलीची मागणी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २५ फेब्रूवारी-**

यावर्षी मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतची निवडणूक घोषित होण्यापूर्वी ज्या गावात अनेक वर्षापासून ठाण मांडून बसलेले ग्रामसेवकांची त्या गावातील काही राजकीय व्यक्तीसोबत जवळीकता निर्माण होऊन त्याचा परिणाम निवडणूक प्रक्रियेवर होऊ शकतो म्हणून सदरील निवडणूक प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने व भयमुक्त वातावरणात पार पाडण्याकरिता जो ग्रामसेवक नियमानानुसार बदलीस पात्र आहेत त्या ग्रामसेवकांची बदली करणे अत्यंत गरजेचे असल्याचे नागरिकांमधून बोलले जात असून याकडे निवडणूक आयोग कोणती कारवाई करते याकडे जनतेचे लक्ष लागून आहेत.

सध्या प्रशासन हे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी म्हणून प्रारूप प्रभाग रचनेच्या कामासाठी गतिशील असून नियमानुसार ज्या ग्रामसेवकाची संबंधित ग्रामपंचायत अंतर्गत सेवा कार्यकाळ पूर्ण झालेला आहे तरीपण राजकीय पक्षाशी हित संबंधातून निवडणुकीच्या काळात ढवळाढवळ करणे, एकाच पक्षाची बाजू मांडणे, साम दाम दंड भेद यासारख्या गोष्टीचा वापर करून एकाच पक्षासाठी अनुकूल वातावरण तयार करणे यासाठी कामी येणे अशीही शंका नागरिकांकडून व्यक्त होत असून ते निवडणूक आयोगाच्या भयमुक्त व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात येणाऱ्या निवडणुक आयोगाच्या या उदात्त हेतूस व धोरणास सरळ- सरळ हरताळ फासल्याशिवाय राहणार नाहीत तरी हदगाव तालुक्यातील ग्रामपंचायतीत ज्या ठिकाणी या वर्षी निवडणुका होणार आहेत त्या ठिकाणीहून अश्या ठाण मांडून बसलेल्या व बदलीस पात्र असलेल्या ग्रामसेवकांची तात्काळ बदली निवडणूक आयोगाने करावी अशी मागणी जनतेतून जोर धरत आहे आता निवडणूक आयोग याकडे कसे पाहते व निर्णय कधी घेते याची उत्सुकता ग्रामीण भागातील नागरिकांना लागलेली आहे.

# किनवटमध्ये अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान; हेक्टरी ५० हजार भरपाईची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २५ फेब्रूवारी-**

तालुक्यात दिनांक २३ व २४ फेब्रुवारी रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील मका, गहू तसेच आंबा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) च्या वतीने सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, किनवट झेनिथ चंद्र दोनतुला यांना निवेदन देण्यात आले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या बेबीताई नाईक यांच्या नेतृत्वाखाली तालुकाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड यांच्यासह शिष्टमंडळातील नेत्यांच्या उपस्थितीत दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, डोंगरगाव (चि.), दिग्रस, चंद्रपूर, सावरी, शिवणी (चि.) थारा, माळकोल्हारी तसेच इतर गावांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. यामुळे शेतातील मका व गहू पिके आडवी पडून मोठे नुकसान झाले असून आंबा बागांनाही फटका बसला आहे.

यावर्षी पावसाळ्यात सततच्या पावसामुळे खरीप पिकांचे नुकसान झाले होते. त्यानंतर रबी हंगामात मका व गव्हाची मोठ्या प्रमाणात पेरणी करण्यात आली होती. पिके चांगली उभी असतानाच अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कोसळले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे तात्काळ पंचनामे करून शासनाने हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच सर्व शेतकऱ्यांच्या शेतीबांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून त्वरित मदत जाहीर करावी, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी बोबीताई प्रदीप नाईक, अॅड. राहुल नाईक, बंडूसिंग नाईक, गजानन पाटील सोळंके, माजी सभापती अनिल पाटील कऱ्हाळे, हसनलाला (उपनगराध्यक्ष, किनवट नगर परिषद), जाहिरोद्दीन खान, नगरसेवक अभय महाराज, शामराव भुरके गुरुजी , लक्ष्मण पाटील देशमुख, श्रीराम मेंढे, धर्तीनाथ वागतकर, परमेश्वर मेंढे, पांडुरंग मेंडके, प्रेमसिंग साबळे, युवराज हुरदुके, तुकाराम मेंडके, संतोष खुडे, तुकाराम साबळे, सतीश डोईफोडे, नागेश डवरे आदी उपस्थित होते.

# तरुण पिढीने निर्व्यसनी आयुष्य जगून आई-वडिलांची सेवा करावी: प्रा. हंकारे

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. २५ फेब्रूवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या बापाने रयतेचे स्वराज्य निर्माण केले. प्राण गेला तरी छत्रपती संभाजीराजे सारख्या मुलाने या स्वराज्याला हात लावू दिला नाही. आजच्या तरुण पिढी ने ही निर्व्यसनी आयुष्य जगून आई-वडिलांची सेवा करावी. तरच आपण छत्रपती शिवाजी महाराज यांचे हे विचार आत्मसात केले. असे समजून शिवजयंतीचे सार्थक झाले असे मत प्रसिद्ध व्याख्याते प्रा.डॉ.वसंत हंकारे यांनी व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अर्धापूर शहरातील कै. सखारामजी लंगडे सर मधील महात्मा बसवेश्वर विद्यालयाच्या प्रांगणात प्रा.डॉ. वसंत हंकारे यांचे शिवव्याख्यान संपन्न झाले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, आजची तरुण पिढी प्रचंड व्यसनाधीन होत आहे. एखादा नायक जाहिरातीत म्हटला व्यसन करा तर आपण व्यसन करावे का? हा प्रश्न आपण आपल्याला विचारला पाहीजे. एकीकडे महापुरुषांची जयंती साजरी करायची आणि दुसरीकडे व्यसनाकडे वळायचे. हे प्रचंड चुकीचे आहे.



आपल्या आयुष्यात आई-वडील यांचे महत्व ज्याला समजले. त्याच्या इतका जगात कुणीच समजूतदार नाही. तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या मुली जर एखाद्या छपरी पोराच्या प्रेमात पडली तर त्या बापाला काय वेदना होतात. तो एक बापच समजू शकतो. शत्रूच्या महिलेलाही आपली बहीण आणि आई समजणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात तरुणांनी दुसऱ्याच्या बहिणीला पळवताना आपल्या आई-वडिलांचे संस्कार आठवावेत. असे विचार प्रा.डॉ. हंकारे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

यावेळी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त तालुकास्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत यश मिळवलेल्या अनुष्का आनंद कोल्हे, अनुष्का चंद्रकांत लासिनकर, अथर्व पंजाब कल्याणकर, मुकुंद गोविंद भुतडा, अनुराधा नागेश आव्हाड, शुभम गंगाराम भालेराव, पलसिद्ध संतोष गोदरे यांचा पारितोषिक व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष सौ.वैशालीताई प्रविण देशमुख यांच्या हस्ते व्याख्याते प्रा.डॉ. वसंत हंकारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह महिला, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आणि सारे वातावरण भावूक....**

या व्याख्यानात महिला आणि विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा.डॉ.वसंत हंकारे यांच्या भाषण शैलीने एक टक तब्बल दोन तास लक्ष्य वेधून घेतले. आई आणि बाप समजून घेताना बहुतांशी लोकांनी आपल्या अश्रूना वाट मोकळी करून दिली. त्यांच्या या मनोगताने अक्षरशः तब्बल दोन तास संपूर्ण वातावरण भावूक झाले होते.

**कार्यालय नगरपरिषद, कंधार जि.नांदेड**
ई-मेल cokandhar@gmail.com | टोल फ्री क्र.18002333438
दुरध्वनी क्र. कार्यालय (02466) 223436 | जा.क्र./ ५१६ /2026
शाखा: बांधकाम विभाग | दिनांक 25 / 02 /2026
K.M.C.

**जावक क्र. ५१६/२०२६ नगरपरिषद कंधार जिल्हा नांदेड दिनांक २५/०२/२०२६**
**बांधकाम विभाग ई-निविदा सुचना क्र. (०६) सन. २०२५ २६**

कंधार नगरपरिषदे तर्फे नगरोत्थान योजने अंतर्गत अंतर्गत १) कंधार नगरपरिषद ता. कंधार जि. नांदेड अंतर्गत अभिनवनगर येथे उद्यान विकसीत करणे २) शांतीदुत स्व. गोविंदराव चिखलीकर उद्यान हुतात्मा स्मारक अद्यावत करणे. करिता ई-निविदा मागविण्यात येत आहे, तरी इच्छुकांनी कामाकरिता ई-निविदेत भाग घ्यावा.

**नियम व अटी**

उपरोक्त योजनेतील ई-निविदेचे वेळापत्रक आणि संपूर्ण तपशील दिनांक २६/०२/२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजता पासुन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात आली आहे. तसेच निविदेसंबंधी या पुढील सर्व सुचना/शुध्दीपत्रक सदर संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद कंधार**

## संक्षिप्त वृत्त...

### २६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान ४४ वा स्काऊट-गाईड जिल्हा मेळावा

**परभणी,/प्रतिनिधी:**-तालुक्यातील पिंगळी येथील श्री गोकुळात मंदिर परिसरात २६ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत ४४ व्या स्काऊट-गाईड जिल्हा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात जिल्ह्यातील जास्तीत जास्त स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक तथा माध्यमिक) तथा जिल्हा मुख्य आयुक्त डॉ. सविता बिरगे यांनी केले आहे.

तीन दिवसीय या मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणाऱ्या विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पाथसंचलन स्पर्धा, तंबू उभारणी, बिनभांड्याचे स्वयंपाक, शेकोटी कार्यक्रम, तंबू निरीक्षण, बँड पथक स्पर्धा, शोभायात्रा, प्रदर्शनी स्पर्धा, मानवी मनोरे स्पर्धा तसेच प्रथमोपचार स्पर्धा आदी स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांच्या हस्तकौशल्याचा विकास, जबाबदारीची जाणीव आणि नेतृत्वगुण वृद्धिंगत करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या जिल्हास्तरीय मेळाव्यात सुमारे ८०० ते १००० विद्यार्थी सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली असून, अधिकाधिक शाळांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. सविता बिरगे, जिल्हा चिटणीस गजानन वाघमारे, जिल्हा संघटक रमेश जाधव तसेच प्रा. उपेंद्र दुधगावकर यांनी केले आहे.

**परभणी,/प्रतिनिधी :** जन्म व मृत्यू प्रमाणपत्रे देताना सखोल पडताळणी करूनच प्रमाणपत्र देण्यात यावे तसेच कोणत्याही दबावाखाली येऊन चुकीची प्रमाणपत्रे देऊ नयेत, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. नगरसेवक रितेश झांबड, सौ. गिरीजा शंकर आजेगावकर, सौ. वैशाली दैठणकर, सौ. सुशिला थोरात, सपना जुक्टे, डॉ. केदार खटींग, गणेश टाक आदींनी बुधवार १८ फेब्रुवारी रोजी महापालिका आयुक्तांना एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, नूतन महापौर यांनी अलीकडेच जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयास भेट देऊन प्रलंबित प्रमाणपत्रांच्या बाबत अधिकाऱ्यांना विचारणा केली. प्रमाणपत्रे देण्यात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करण्याचा त्यांचा दृष्टिकोन स्वागतार्ह असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, कोणतेही प्रमाणपत्र शहानिशा, कागदपत्रांची तपासणी व आवश्यक पुरावे पडताळल्याशिवाय देण्यात येऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे.यापूर्वी परभणी शहरात बांगलादेशी घुसखोरीच्या प्रकरणात हजारो व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्यात आल्याचा मुद्दा राज्यभर गाजला होता.

### सेलूतील प्रमुख मार्गांवर गतिरोधक बसवा; श्री व्यंकटेश्वर प्रतिष्ठानची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील प्रमुख मार्गांवर तात्काळ गतिरोधक बसवावेत, अशी मागणी येथील श्री व्यंकटेश्वर प्रतिष्ठानने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता यांच्याकडे केली आहे.

जयसिंग शेळके, गणेश शेवाळे, विनोद धापसे, कृष्णा पडघन, अक्षय सोळंके, पवन धुमाळ, आकाश इघवे, करण ढवळे आदींच्या शिष्टमंडळाने बुधवार २५ फेब्रुवारी रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता यांना एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, सेलू शहरातील रायगड कॉर्नर ते परभणी रोड, नूतन महाविद्यालय ते बाबासाहेब मंदिर रोड तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते वालूर नाका हे सर्व मार्ग अत्यंत रहदारीचे आहेत. या मार्गांवर चार शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग तसेच नागरी वसाहती असून लहान मुले व वयोवृद्ध नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर वावर असतो. दुचाकी व चारचाकी वाहनधारकांकडून या मार्गांवर बेदरकारपणे व वेगाने वाहने चालविली जात असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये अनेकांनी आपले जीव गमावले असून काही जण कायमचे अपंग झाले आहेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात विद्यार्थी सायकलवरून ये-जा करीत असतात. भरधाव वाहनांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित तिन्ही मार्गांवर तात्काळ गतिरोधक बसवावेत; अन्यथा श्री व्यंकटेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

### वरुड नृसिंह येथील प्रगतशील शेतकरी अमोल थिटे यांचा सन्मान

**परभणी,/प्रतिनिधी :** वरुड नृसिंह येथील प्रगतशील शेतकरी अमोल सुरेशराव थिटे यांचा कृषी विज्ञान केंद्र परभणी यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

दादा लाड कापूस लागवड पद्धतीनुसार कापूस पिकाची लागवड करून उल्लेखनीय उत्पादन घेतल्याबद्दल तसेच सेंद्रिय व जैविक शेतीत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना डॉ. दादा लाड यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर जीवन ज्योत ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती लक्ष्मीताई देशमुख, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक रविराज देशमुख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथील शास्त्रज्ञ डॉ. बेग व डॉ. अहिरे, तसेच केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील डॉ. तायडे व डॉ. रामकृष्ण आदी मान्यवर उपस्थित होते.

सत्कार स्वीकारताना अमोल थिटे यांनी उपस्थित शेतकरी व मान्यवरांसमोर शेतीतील आपले अनुभव मांडले. घन लागवड पद्धतीचा अवलंब, सेंद्रिय घटकांचा वापर आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनामुळे उत्पादनात कशी वाढ झाली, याबाबत त्यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. यावेळी कापूस पिकातील घन लागवड पद्धती अर्थात ‌ढदादा लाड कापूस लागवड पद्धतफ विकसित केल्याबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झाला.

# अवकाळी पाऊस व गारपीटग्रस्त नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा

## आ.डॉ.रत्नाकर गुट्टे यांची मुंबईतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** माझ्या विधानसभा मतदारसंघासह परभणी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह सुरू असलेल्या अवकाळी पावसाने आणि गारपीटीने शेतकरी व शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. तूर आणि हरभरा काढणीवर संकटाचे ढग उभे आहेत. या अवकाळी पावसामुळे गहू, ज्वारी, हरभरा, ऊस यासह इतर हंगामी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातले उभे पीक आडवे झाल्याने व पाण्याखाली गेल्याने उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांपुढे मोठे संकट उभारले आहे. त्यामुळे संबंधित नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरघोस नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी मुंबई येथील अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधीद्वारे मांडली.



सध्या तूर व हरभरा काढणीची तयारी अंतिम टप्प्यात आहे. अनेक शेतकऱ्यांची पीक गोळा करण्याची लगबग सुरू आहे. अशा परिस्थितीत अवकाळी पावसामुळे शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. शिवाय, अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे ताडपत्री खरेदी करावी लागत असल्याने शेतकऱ्यांच्या खिशाला आर्थिक झळ बसत आहे. अवकाळी पावसाच्या धास्तीने तूर, हरभरा पिकांचे खळे लवकर आवरण्यासाठी शेतकरी रात्रंदिवस शेतातच तळ ठोकून पिकांचे संरक्षण करताना दिसत आहेत. या नैसर्गिक संकटांमुळे मतदारसंघातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकरी बांधवांना दिलासा द्या, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी लक्षवेधीद्वारे नमूद केले आहे. खरीप हंगामातील नुकसानानंतरही नैसर्गिक संकटे शेतकऱ्यांची पाठ सोडायला तयार नाहीत. वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे बहारात आलेल्या गहू, ज्वारी, बाजरी या पिकांसह काढणीला आलेल्या हरभरा पिकाला नुकसानीला सामोरे जावे लागले. अनेक शिवारात वाऱ्यामुळे पिके आडवी झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागणार आहे. गंगाखेड तालुक्यातील डोंगरजवळा माखणी डोंगरगाव सिरसम डोंगरपिंपळा मानकादेवी उंडेगाव शेलमोहा तांदुळवाडी अंतरवेली कातकरवाडी ढेबेवाडी कोदरी खादगाव पिंपळदरी दामपुरी बोर्डा बडवणी वाघदरा खोकलेवाडी सुप्पा कुंडगिरवाडी निळानाईक तांडा चिलगरवाडी इत्यादी गाव शिवारात वाऱ्यासह पाऊस झाल्याने ज्वारी, हरभरा, गहू, बाजरी ही पिके आडवी झाली. तसेच पालम तालुक्यात वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावल्याने ज्वारी, गहू, हरभरा या पिकांचे नुकसान झाले. शिवाय, पूर्णा तालुक्यातील खुजडा, चुडावा, ताडकळस शिवारात पिकांचे नुकसान झाल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी सभागृहाच्या निर्देशनास आणून दिले. अवकाळी पाऊस व गारपिटीने परभणी जिल्ह्यासह गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांत शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेल्या पिकांवर मोठे संकट ओढवले आहे. रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला तसेच आंबा, डाळिंब, द्राक्ष, टरबूज यांसारख्या फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी अक्षरशः हतबल झाला आहे. तसेच गंगाखेडसह पालम आणि पूर्णा या तालुक्यांतील शेतकऱ्यांना या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका बसल्याचेही आ.डॉ. गुट्टे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या लक्षवेधीवर उत्तर देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी, परभणी जिल्ह्याप्रमाणेच राज्यातील ज्या-ज्या भागात अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाले आहे, त्या सर्व ठिकाणी प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश दिले जातील, अशी ठोस ग्वाही दिली. तसेच मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून हे आदेश देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.



### जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या उपोषणास भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांची भेट

**परभणी,/प्रतिनिधी :**परभणी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या उपोषणाच्या अनुषंगाने आज उपोषणस्थळी भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी उपोषणकर्त्या कर्मचाऱ्यांशी सविस्तर संवाद साधून त्यांच्या मागण्या व अडचणी जाणून घेतल्या. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या चौथ्या वेतन आयोगानुसार वेतनत्रुटी दूर करून सुधारित वेतनश्रेणी लागू करणे, पदनामात बदल करणे व पदोन्नतीचे साखळी लाभ मंजूर करणे, सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना () लागू करणे, गोदावरी महामंडळात समाविष्ट असताना वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांचे वेतन पूर्वीप्रमाणे कोषागार कार्यालयामार्फत देणे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपा तत्त्वावर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, जिल्हा परिषदेमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समावेशन मूळ व जलसंधारण विभागामध्ये करणे या मागण्यासाठी आंदोलन सुरू होते.

यावेळी श्री. शिवाजी भरोसे यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्या रास्त व न्याय्य असल्याचे सांगून, कर्मचाऱ्यांचे प्रश्न संवादातून व चर्चेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

यावेळी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेचे श्री. मुकुंद खिराडे, श्री. ज्ञानेश्वर शेळके, श्री. मिलिंद खिल्लारे, श्री. संतोष पाठक, श्री. रोहिदास शिनगारे यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.

### केदार पाथरकर यांचा पत्रकारितेतील कार्याबद्दल सन्मान



**पूर्णा,/प्रतिनिधी:** सामाजिक प्रश्नांवर परखड भूमिका मांडत लोकहितासाठी सातत्याने लेखन करणारे पूर्णा येथील पत्रकार केदार पाथरकर यांचा छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. पत्रकारितेतील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना सन्मानचिन्ह व शाल-श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. हा कार्यक्रम कण्व सभागृह, शिवाजीनगर, छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात पार पडला. यावेळी समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष रेणुकदास मुळे, प्रमुख पाहुणे म्हणून न्यू इंडिया इन्शुरन्सचे मिलिंद दामोदरे, ज्येष्ठ पत्रकार सुशिल कुळकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात केदार पाथरकर यांनी पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी, ग्रामीण भागातील पत्रकारितेची आव्हाने आणि बदलत्या काळातील माध्यमांची जबाबदारी यावर आपले परखड विचार मांडले. तसेच प्रियांका दामोदर, किरण तायडे, मनोज जैन आदींनीही मनोगत व्यक्त करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचाही सन्मान करण्यात आला.

## भाजपा जिंतूर पंचायत समिती १४ सदस्यांच्या उपस्थितीत गटनेतेपदी भास्करराव ठोंबरे उपगटनेतेपदी सोनाली दराडे प्रतोद पदी परमेश्वर ठाकरे यांची निवड

**जिंतूर/प्रतिनिधी - :** भाजपा जिंतूर पंचायत समिती १४ सदस्यांच्या उपस्थितीत गटनेतेपदी भास्करराव ठोंबरे उपगटनेतेपदी सोनालीताई दराडे प्रतोद पदी परमेश्वर ठाकरे यांची निवड



जिंतूर पंचायत समितीमध्ये भाजपा पक्षाच्या १४ सदस्यांचा गटनेता पदी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या उपस्थितीत भास्करराव ठोंबरे यांची निवड करण्यात आली व तसेच उपगटनेतापदी सोनालीताई दराडे व प्रतोद पदी परमेश्वर ठाकरे यांची जिल्हाधिकारी व सदस्य भगवानराव जगताप तहेसीन देशमुख बाळासाहेब साखरे धम्मपान भीमराव सरितताई नागरे अयोध्याताई खिस्ते अश्विनीताई दाभाडे आशामतीताई घुगे रंजनाताई सांगळे पुजाताई ढोणे मीराताई वजीर यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली.

याप्रसंगी मीनाताई बोर्डीकर डॉ. पंडितराव दराडे गोविंदराव थिटे नानासाहेब राऊत आत्माराम पवार प्रसादराव बुधवंत राजेंद्र नागरे अविनाश काळे राजाभाऊ घुगे खेत्रे आबा शिवाजी कदम मतीन तांबोळी सुनील मते विकास जाधव माधव दराडे पिंटू खिस्ते शिवाजी काळे शिवशंकर तमशेटे बालाजी सांगळे चिंतामण दौंड नानासाहेब देशमुख अमोल देशमुख यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## मृताच्या नावे गुन्हा अन् नवरदेवाच्या हाती बेड्या; बोरी दंगल प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

**बोरी,/प्रतिनिधी :-** एकीकडे लग्नाची लगबग आणि दुसरीकडे कारागृहातील बंदिवास, अशा कात्रीत सापडलेल्या स्वप्नील संजय शिंपले या तरुणाला परभणी सत्र न्यायालयाने मोठा दिलासा दिला असून त्याची जामिनावर सुटका करण्याचे आदेश दिले आहेत. दि. १९ फेब्रुवारीला रात्री ११ च्या सुमारास बोरी येथे पुतळा प्रतिष्ठापनेप्रसंगी दंगल झाल्याचे नमूद करत पोलिसांनी दि. २० फेब्रुवारी रोजी ४६ जनांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या () तब्बल १३ कलमांखाली बोरी पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदवला होता. यात १०९, ११८(१), ११८(२), १३२, ४९, ६१(२), ११५(२), १८९(२), १८९(४), १९०, १९१(३), १२५(ब) आणि १२१(२) यांसारख्या कलमांचा समावेश होता. सरकारी कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला करण्यापासून ते दंगल घडवण्यासाठी गुन्हेगारी कट रचण्यापर्यंतचे गंभीर आरोप लावून पोलिसांनी आरोपींची नाकेबंदी केली होती आणि संशयित म्हणून स्वप्नील शिंपले या तरुणास २० फेब्रुवारीला दुपारी अटक करून त्याच दिवशी त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत झाली होती.

त्यानंतर त्याने अॅड. सुनिल बुधवंत यांच्या मार्फत जमानतीसाठी परभणी येथील मा. जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. न्यायालयात अटक आरोपीची बाजू मांडताना अॅड. सुनिल बुधवंत यांनी पोलिसांच्या या १३ कलमांच्या डोंगरातील हवा एकाच युक्तिवादाने काढून घेतली. त्यांनी न्यायालयासमोर धक्कादायक पुरावा सादर केला की, पोलिसांनी एफ.आय.आर. मध्ये ज्या आरोपी क्रमांक ४२ (लक्ष्मण माटे) याच्यावर दंगलीचे आणि हल्ल्याचे कलम लावले आहे, त्या व्यक्तीचे निधन १४ नोव्हेंबर २०१५ रोजीच झाले आहे. ''जो माणूस १० वर्षांपूर्वीच हे जग सोडून गेला, तो दंगल करायला आणि पोलिसांवर हल्ला करायला प्रत्यक्ष हजर कसा असू शकतो?'' असा मुद्दा मांडत त्यांनी या प्रकरणात दाखल एफ.आय.आर. मध्ये आरोपींची नावे ही यांत्रिकी आणि मनमानी पद्धतीने गोवल्याचे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच स्वप्नील शिंपले या तरुणाचा विवाह ५ मार्च २०२६ रोजी होणार असून लग्न घटिका जवळ असताना, पोलिसांनी कोणत्याही ठोस पुराव्याविना केवळ संशयावरून स्वप्नीलला अटक केली असून, ''ज्या तपासात पोलिसांना जिवंत आणि मृत व्यक्तीमधील फरक कळत नाही, त्या तपासाच्या आधारे एका नवरदेवाला तुरुंगात डांबणे हा त्याच्यावर आणि त्याच्या कुटुंबावर होत असलेला मोठा सामाजिक अन्याय आहे'' असा मुद्दा अत्यंत संवेदनशीलपणे न्यायालयाला पटवून दिला. या प्रकरणात सरकारी वकिलांनी सुद्धा युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पोलिसांच्या एफ.आय.आर. मधील विसंगती पाहता, परभणी सत्र न्यायालयाने २४ फेब्रुवारी रोजी स्वप्नील शिंपले याला जामीन मंजूर केला. अॅड. सुनिल बुधवंत यांना या प्रकरणात अॅड. भगवान घुगे, अॅड. महेश वाघमारे यांनी सहकार्य केले.

### वरुड नृसिंह गावचे सुपुत्र अमोल थिटे यांचा प्रगतशील शेतकरी म्हणून गौरव......

**जिंतूर,/प्रतिनिधी:** वरुड नृसिंह गावचे सुपुत्र अमोल थिटे यांचा प्रगतशील शेतकरी म्हणून गौरव करण्यात आला होता.

वरुड नृसिंह गावातील प्रगतशील शेतकरी म्हणून ओळख असणारे अमोल सुरेशराव थिटे यांचा कृषी विज्ञान केंद्र परभणी यांच्याकडून दादा लाड कापुस लागवड पद्धतीने कापुस लागवड करून चांगले उत्पादन घेतल्याबद्दल तसेच सेंद्रिय आणि जैविक शेतीत उत्कृष्ट काम केल्याबद्दल डॉ दादा लाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर जीवन ज्योत ट्रस्ट च्या अध्यक्षा श्रीमती लक्ष्मीताई देशमुख, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक श्री रविराज देशमुख, मराठवाडा कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ बेग सर,डॉ.अहिरे सर, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर चे डॉ. श्री तायडे सर,डॉ.श्री रामकृष्ण सर आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळी अमोल थिटे सर यांनी उपस्थित शेतकरी आणि मान्यवर मंडळीसमोर शेतीतील आपले अनुभव आणि उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.तसेच डॉ दादा लाड यांना कापुस पिकांत घन लागवड पद्धत म्हणजेच दादा लाड कापुस लागवड पद्धत संशोधन केल्याबद्दल पद्मश्री मिळाल्याबद्दल दादांचा सत्कार केला यावेळी सोबत बालाजी फरकांडे आपल्या गावातील शेतकरी सह उपस्थित होते

# एसटी बस चालकांच्या प्रसंगावधानाने एकाच दिवशी दोन दुर्घटना टळल्या : परभणी-सोनपेठ शटल सेवा सुरू करण्याची गरज

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** एसटी महामंडळाच्या परभणी -सोनपेठ बस चालकाच्या प्रसंगावधानाने एकाच दिवशी एकाच मार्गावर दोन दुर्घटना टळल्याने प्रवाशांनी सुटकेचा निस्वास सोडला.

परभणी बस स्थानकातून दुपारी ४ वाजता बस क्र. एम. एच. १४ एल. एक्स. ७९६० ही बस सोनपेठ कडे मार्गस्थ झाली. परभणी स्थानकातूनच बसमध्ये पाय ठेवायला जागा नसतांना जवळपास ९० प्रवासी घेऊन बस पोखर्णी गावाच्या पुढे दोन किलोमीटरच्या अंतरावर वळणावरील पुलाजवळ आल्यानंतर अचानक आवाज आला, टायर मधून धूर निघत होता, बसचे समोरील टायर फुटल्याचे चालकाच्या लक्षात येताच बसवर नियंत्रण ठेवत चालकाने प्रसंगावधान ओळखून बसचा वेग कमी-कमी करत बस थांबवली. यामुळे पुढील अनर्थ टळल्यामुळे प्रवाशांनी सुटकेचा निस्वास सोडला. दुसरी बस येईपर्यंत प्रवाशांना तब्बल दीड तास ताटकळत बसावे लागले.

याच दिवशी शेळगाव परिसरात बसची सकाळी दुसरी घटना घडली. परभणी आगाराची सोनपेठहून सकाळी ७ वाजता सुटणारी बस क्र. एम. एच. १३ सी. यु. ६८३८ बस चाकाच्या एक्सेलचे ८ पैकी ३ नटबोल्ट निखळल्याचे चालकाच्या लक्षात आले. चालकाने नटबोल्ट आवळले व बस मार्गस्थ केली. बस शेळगाव टेकडीच्या चढावर येतात दोन नटबोल्ट पुन्हा निखळून पडले हा प्रकार चालकाच्या लक्षात येताच चालकाने बस थांबवली व चाकाची तपासणी केली असता अवघ्या एका नटबोल्टवर ही बस चालल्याचे निदर्शनास आले, बस जागेवरच थांबवल्याने पुढील अनर्थ टाळला.

सोनपेठ मार्गावर सोडण्यात येणाऱ्या बस अस्वच्छ, मोडकळीस आलेल्या बस सोडल्याने व क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवल्याने या मार्गावर अश्या नेहमीच घटना घडत आहेत.

परभणी-सोनपेठ या मार्गावर बसच्या जवळपास २८ फेऱ्या होतात. परभणी-सोनपेठ मार्गावर २८ थांबे आहेत. या थांब्याव्यतिरिक्त सोनपेठ, शिर्शी परिसरातील १८ ते २० गावे या मार्गाला जोडल्या जात असल्युळे या मार्गावर प्रवाशांची नेहमीच गर्दी असते. परभणी व सोनपेठ स्थानकात बस लागतातच प्रवाशांनी हाउसफुल होते. ९० ते १०० प्रवासी बसवत असल्याने ग्रामीण भागातील व दोन्ही स्थानकातून बसमध्ये बसलेल्या प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. निम्म्या प्रवाशांना तर उभे राहूनच प्रवास करावा लागतो, प्रवाशांना मात्र हे आता नित्याचेच झाले आहे. दर तासाला बस असली तरीही अनेक वेळा बस रद्द केली जाते. पूर्ण तिकीट काढूनही बसमध्ये बसायला जर जागा नसेल तर बसचा प्रवास करायचा कशाला? असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे.

### सोनपेठ मार्गावर शटल सेवा सुरू करण्याची गरज....

परभणी आगाराला सोनपेठ मार्गावर दररोज लाखो रुपयांचे उत्पन्न मिळते. सोनपेठला दर तासाला सोडण्यात येणारी बस रात्री ९ वाजेपर्यंत शटल सेवा सुरू करावी अशी प्रवाशांची अनेक दिवसापासून मागणी आहे, परंतु या मागणीकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होतांना दिसत आहे. या मार्गावरून सुरू असणारी परभणी- पंढरपूर बस मागील अनेक दिवसापासून बंद करण्यात आलेली आहे. छत्रपती संभाजीनगरला जाण्यासाठी सोनपेठहून एकही बस नाही यामुळे परभणी आगाराने लांब पल्ल्याच्या बस सुरू करून सोनपेठला दर अर्ध्या तासाला बस सोडण्यात याव्यात अशी मागणी आहे.